# आज मंत्रालयावर धडकणार: भीमसैनिक आंबेडकरी व संविधान प्रेमी नागरिकांचे राज्यव्यापी आंदोलन

■महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :

परभणीतील शहीद सोमनाथ सुर्यवंशी व लोकनेते विजय वाकोडे यांना न्याय मिळवून देण्यासाठी आज मार्च सोमवार रोजी आझाद मैदान, मुंबई येथे सकाळी वाजता आंबेडकरी जनतेच्या वतीने राज्यव्यापी शांततामय आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाद्वारे राज्यसरकारला जाब विचारण्याची तयारी असून, महाराष्ट्रभरातून हजारोंच्या संख्येने भीमसैनिक आंबेडकरी समाज व संविधान प्रेमी नागरिक मंत्रालयावर धडकणार आहेत.परभणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची सोपान निवृत्ती पवार यांनी तोडफोड विटंबना केल्याप्रकरणी, स्थानिक आंबेडकरी व संविधान प्रेमी नागरिकांनी ठामपणे निषेध आंदोलन राबवले होते.

या आंदोलनादरम्यान, पोलिसांनी प्रचंड मारहाण केली, ज्यात शेकडो निरपराध महिला, अल्पवयीन तरुण व वयोवृद्ध नागरिक अटक करून त्यांच्यावर विविध गुन्हे दाखल करण्यात आले. या कठोर कारवायीत, सोमनाथ सुर्यवंशी यांचा पोलिसांच्या अमानुष मारहाणमुळे मृत्यू झाला व दुसऱ्या दिवशी शांततेत आंदोलन करणारे आंबेडकरी लोकनेते विजय वाकोडे यांच्याही मानसिक धक्याने हृदय विकाराने मृत्यू पावला.या प्रकरणी न्याय मिळवून देण्यासह पुढील मागण्यांची अंमलबजावणी करण्यासाठी आंबेडकरी व संविधान प्रेमी नागरिक शांततामय आंदोलन करणार आहेत. या आंदोलनास डॉ. सिद्धार्थभाऊ हत्तीअंबिरे, समस्त



आंबेडकरी संघटना व संविधान प्रेमी नागरिकांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

**प्रमुख मागण्या:**

. परभणीतील संविधान शिल्प प्रतिकृती विटंबना करणाऱ्या सोपान पवार यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करणे.

. सोमनाथ सुर्यवंशीच्या मृत्यूची उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींकडून न्यायालयीन चौकशी करणे.

. सोमनाथ सुर्यवंशीच्या मृत्यूस जबाबदार पोलिसांवर हत्येचा कलमान्वये मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्यांना सेवेतून बडतर्फ करणे.

. सोमनाथ सुर्यवंशी व लोकनेते विजय वाकोडेंच्या कुटुंबियांना प्रत्येकी कोटी रुपये देणे व कुटुंबातील एका व्यक्तीला शासकाची नोकरी देणे.

. पोलीसांनी केलेल्या कोंबींग ऑपरेशन दरम्यान निरपराध भिमसैनिकांवरील दाखल केलेले गंभीर गुन्हे तात्काळ मागे घेणे.

. पोलिसांनी केलेल्या बेदम मारहाणीत जखमी झालेल्या भीमसैनिकांना आर्थिक मदत देणे तसेच वत्सलाबाई मानवते यांना झालेल्या मारहाणीसंबंधी गुन्हे दाखल करणे व दोषी पोलिसांना आर्थिक मदत देणे.

. सोमनाथच्या हत्येस कारणीभूत असलेल्या संबंधीत पोलीसांवर ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करणे.

. अन्यायग्रस्त नागरीकांनी दोषी पोलिसांवर जिल्हा पोलीस अधीक्षक विरुद्ध फिर्यादी दाखल करणे.

. राज्य शासनाने हा खटला फास्टट्रॅक कोर्टमध्ये चालवणे.या आंदोलनाद्वारे न्यायसंगत कारवाई व राज्यातील अनियमितता दूर करण्याची मागणी केली जात आहे.

# संजय राऊत यांची दुटप्पी भूमिका शरद पवार पक्षाची कठोर टीका

■महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :

शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी मनसेच्या पुस्तक प्रदर्शनाला उपस्थित राहून पुन्हा एकदा आपली राजकीय दुटप्पी भूमिका स्पष्ट केली आहे. शरद पवारनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिल्लीत पुरस्कार देऊन गौरवले असता, राऊतांनी त्याच प्रसंगी कडाडून टीका केली.

याचबरोबर, संजय राऊतांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यक्रमाला जाऊन सहभाग घेणे, त्यांच्या राजकीय निष्ठा आणि विचारधारेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. या विरोधाभासी वागणुकीमुळे त्यांच्या विरोधकांमध्ये नाराजीची लाटा पसरली आहे.मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला



आहे, ही वस्तुस्थिती सर्वश्रुत असतानाही, संजय राऊत यांनी पुस्तक प्रदर्शनात उपस्थित राहून अप्रत्यक्षपणे महायुतीशी जवळीक साधण्याचा प्रयतक केला आहे असे आरोप उठवण्यात आले आहेत. एका ठिकाणी महायुतीच्या विरोधात आग ओकावण्याची, तर दुसऱ्या ठिकाणी त्यांच्या समर्थकांच्या कार्यक्रमांना हजेरी लावण्याची ही द्वंद्वात्मक भूमिका, राजकीय प्रामाणिकतेबद्दल गंभीर प्रश्न उभे करते.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते व युवक मुंबई अध्यक्ष ड. अमोल मातेले यांनी संजय राऊत यांच्या या द्विदलीय भूमिकेवर तीव्र शब्दांत टीका केली. मातेले म्हणाले, संजय राऊत यांनी स्वतःला मोठा राजकीय विश्लेषक समजण्याचा प्रयतक केला, परंतु ते कोणत्या विचारधारेचे आहेत हे त्यांना स्वतःच स्पष्ट माहित नाही. राजकीय मतभेद असतील तर ठामपणे विरोध करावा, पण एका ठिकाणी शिवसेनेच्या गद्दारांना गद्दार म्हणणे आणि दुसरीकडे त्यांना अप्रत्यक्ष पाठिंबा देणाऱ्या नेत्यांच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणे, हा प्रकार पूर्णपणे गैरसमजूतदार आहे.राजकीय प्रामाणिकपणाचा अभाव असलेल्या नेत्यांनी नैतिकतेच्या गप्पा मारू नयेत, असे या टीकेचे मुख्य मुद्दे आहेत.

संजय राऊत यांची ही कृती केवळ स्वार्थासाठी घेतलेला आणखी एक धक्कादायक पावला असल्याचे त्यांच्या विरोधकांचे म्हणणे आहे, ज्यामुळे महाराष्ट्रातील राजकीय कार्यकर्त्यांनी त्यांच्या विधानांना गांभीर्याने घेण्याची गरज आहे असे मत व्यक्त केले जात आहे.

# राज्यात महिला सुरक्षिततेची गंभीर अडचण; फडणवीसांनी राजीनामा द्यावा, असे काँग्रेसचे हर्षवर्धन सपकाळांचे आरोप

■महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :

राज्याच्या विविध भागातील महिला अत्याचारांच्या घटनांमुळे महाराष्ट्र आता महिला मुलींसाठी सुरक्षित राहिला नाही हे ठसवून सांगितले गेले आहे. केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलींची टवाळखोरांनी छेडकावणी केली आणि सुरक्षारक्षकांना धक्काबुक्की केली. आरोपींना अटक न होत असल्याने खडसे यांना पोलिस स्टेशनला जाऊन ठिय्या द्यावी लागल्यामुळे जंगलराज आल्याचे निदर्शनास आले आहे.

या घटनेमुळे राज्यातील कायदा



सुव्यवस्थेची मान शरमेने खाली गेल्याचे मत असते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांनी तात्काळ राजीनामा देणे आवश्यक असल्याचे ठामपणे सांगितले आहे. सपकाळांनी म्हटले, गुंडांना राजाश्रय मिळाल्यामुळे राज्यात महिला मुलींवरील अत्याचार प्रचंड वाढले आहेत. केंद्रीय मंत्र्यांच्या मुली सुरक्षित नसल्याचे दाखवून, सर्वसामान्य आई-वडिलांच्यामुलींची परिस्थिती किती दयनीय आहे यावरही विचार होणे गरजेचे आहे.

सपकाळांच्या मते, गृहमंत्री आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गृहखात्यावर तसेच गुन्हेगारांवर वचक राहिल्यामुळे राज्यात पोलिसांच्या जागी गुंडांचे राज्य झाले आहे. सुरक्षारक्षक सोबत असतानाही टवाळखोरांनी छेडकावणी केली गेल्यामुळे कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे उघड झाले आहेत.

यासोबतच, महायुती सरकारने निवृत्त पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची मुदतवाढ केल्यामुळे गुन्हेगारांचे मनोबल अजून वाढल्याचे आरोप असंख्य सामाजिक नेत्यांनी केले आहेत. राज्याला सक्षम पोलीस महासंचालक आणि पूर्णवेळ गृहमंत्रींची आवश्यकता आहे, असे सपकाळांनी अधोरेखित केले आहे.

या घटनेवरून महाराष्ट्रातील महिला सुरक्षा आणि कायदा सुव्यवस्थेच्या सुधारणा तातडीने करण्याची गरज स्पष्ट होते.

# केंद्रीय मंत्र्यांच्या मुलीची छेडछाड; विजय वडेट्टीवार यांची महायुती सरकारवर टीका

■महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :

पोलिस सुरक्षा असतानाही केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीची छेड काढल्याच्या घटनेने महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनेवर विधानसभेतील काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत महायुती सरकारवर सडकून टीका केली आहे.वडेट्टीवार म्हणाले, पोलिस सुरक्षा असतानाही केंद्रीय मंत्र्यांच्या मुली आज महाराष्ट्रात सुरक्षित नाहीत, तर शेतात, नोकरीवर जाणाऱ्या सर्वसामान्य मुलींना किती संघर्ष करावा



लागत असेल याचा अंदाज महायुतीच्या मंत्र्यांना नाही.

या प्रकरणातील आरोपींना पकडण्यासाठी मंत्र्यांनाच थेट पोलिस ठाणे गाठावे लागले, हे गंभीर असून राज्यात पोलिसांचा धाक राहिलेला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. गुंडांना महायुती सरकारचे राजकीय संरक्षण मिळत असल्याने पोलिस बेफिकीर झाले आहेत, असा आरोप त्यांनी केला.

महिला सुरक्षेबाबत सरकारच्या निष्क्रियतेवर हल्लाबोल करत वडेट्टीवार म्हणाले, लाडक्या बहिणीचे नारे देणाऱ्या महायुती सरकारला त्यांच्या स्वतःच्या मंत्र्यांनीच वास्तवाचा आरसा दाखवला आहे. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यावर कधी जागे होणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.ही घटना महाराष्ट्रातील महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भातील भीषण परिस्थिती दर्शवते, असे सांगत त्यांनी राज्य सरकारकडून तातडीने कडक कारवाईची मागणी केली.

# कर्करोगावरील लस देण्याबाबत अजितदादांचीघोषणा !

■महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २ :

: बालकांचे आरोग्य हे केवळ एका कुटुंबापुरते मर्यादित नसते तर ते समाजासाठी आणि देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी देखील तितकेच महत्त्वाचे असते. महिलांमध्ये गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग होण्याचे प्रमाण गेल्या काही वर्षांमध्ये वाढले आहे. या आजारावर लस आली आहे.

ही लस राज्यातील महिला आणि मुलींना कशी देता येईल, यासाठी राज्य सरकार प्रयतक्शील आहे, लवकरच याबाबत सकारात्मक निर्णय होईल, असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

# शिवसेनेला कोणताही अडथळा रोखू शकत नाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■महासागर प्रतिनिधी
ठाणे, दि. २ :

राज्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी अडीच वर्षांपासून सातत्याने काम करत आहोत. त्यामुळे शिवसेनेत मोठ्या प्रमाणावर लोक प्रवेश करत आहेत. आता कितीही संकटे आली तरी शिवसेनेला कोणी रोखू शकत नाही, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एकनाथ पर्व या सांस्कृतिक कार्यक्रमात केले.ठाण्यातील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिंदे म्हणाले, एक सामान्य कार्यकर्त्याला महाराष्ट्राच्या नेतृत्वाची संधी मिळाली. मात्र, काही विघ्नसंतोषी लोकांना हे पचले नाही. ते टीका करत असले तरी मी जनतेच्या सेवेसाठी कायम कटिबद्ध राहीन.आपल्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात आपत्ती व्यवस्थापन, पुनर्वसन, आणि लोककल्याणाच्या योजनांवर भर दिल्याचे त्यांनी सांगितले. कोविड काळात नागरिकांसाठी जीवाची पर्वा न करता कार्य केले. शासन आपल्या दारी उपक्रमामुळे पाच कोटी नागरिकांना थेट लाभ मिळाला. लाडकी बहिणी योजना कधीच बंद होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.महाविकास आघाडीच्या काळात राज्य विकासाच्या बाबतीत मागे पडले होते. मात्र, अडीच वर्षांत ही कमतरता भरून काढली आणि पुढील दहा वर्षांची पायाभरणी केली, असे शिंदे यांनी सांगितले. शिवसेनेत विविध पक्षांतील कार्यकर्त्यांचा प्रवेश सुरू असून, पक्ष अधिक बळकट होत असल्याचे त्यांनी नमूद केले. आता कितीही अडथळे आले तरी शिवसेनेला कोणीही रोखू शकत नाही, असे ते म्हणाले.

# पालघर कार्यालयातून आश्रमशाळा व वसतिगृहातील प्रशिक्षणार्थ्यांना फोसटेक प्रशिक्षण

■महासागर प्रतिनिधी
पालघर, दि. २ :

प्रतिनिधी:

अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्याच्या पालघर कार्यालयातून जिल्ह्यातील आश्रमशाळा व वसतिगृहातील प्रशिक्षणार्थ्यांना फोसटेक ( -) प्रशिक्षण देण्यात आले. गुरुवार दि. फेब्रुवारी व शुक्रवार दि. फेब्रुवारी रोजी हे प्रशिक्षण मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या सूचना व अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य आयुक्त यांच्या निर्देशानुसार आयोजित करण्यात आले.

**प्रशिक्षणाचे उद्दिष्ट आणि पार्श्वभूमी**

हा उपक्रम अन्न सुरक्षा आणि स्वच्छता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने आखण्यात आला आहे.

पालघर जिल्ह्यातील आश्रमशाळा व वसतिगृहातील अधिक्षक/अधिक्षिका, गृहपाल व संबंधित जबाबदार व्यक्ती यांना अन्न सुरक्षेबाबत जागरुक करण्यात येत असून, भविष्यात अन्न विषबाधा किंवा अन्न सुरक्षा विषयक तडजोड टाळण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. अन्न सुरक्षा व मानके प्राधिकारण, नवी दिल्ली यांच्या माध्यामातून हा उपक्रम राबवून अन्न व्यवसायाशी संबधित व्यक्तींना प्रशिक्षण देण्यात येत असून त्यांना म्हणून प्रमाणित केले जाते.

**प्रमुख मार्गदर्शक आणि उपस्थित व्यक्ती**

प्रशिक्षणाचे नियोजन अन्न सुरक्षा अधिकारी गो. वि. माहोरे व उ. रा. कावळे यांनी केले होते. कोकण विभागाचे सहआयुक्त श्रीकांत करकळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणाचे कार्य सुरळीत पार पडले. सहायक आयुक्त (अन्न) द. सु. साळुंखे व प. रा. सिंगरवाड यांनी प्रशिक्षणार्थींना अन्न सुरक्षा व स्वच्छता, अन्नपदार्थ हाताळणी तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळणी संदर्भातील महत्वाच्या बाबींवर मार्गदर्शन केले. भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या अधिकृत प्रशिक्षण भागीदार चे प्रशिक्षक श्रीमती हुमा यांनी सुरक्षित आणि दर्जेदार अन्न पोहोचवण्याबाबत प्रशिक्षण दिले.

**आगाऊ उपक्रम व उपस्थिती**

अन्न सुरक्षा विषयक जागरुकता मोहिमेच्या संदर्भात, मागील आठवड्यात आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थी व शालेय विद्यार्थ्यांसाठी आरोग्य केंद्रस्थानी अन्न सुरक्षा प्रशिक्षण व जनजागृती मोहिमेची सुरुवात करण्यात आली होती. मंत्री श्री नरहरी झिरवाळ यांनी अन्न सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड न करण्याचे आश्वासन दिले होते.

या उपक्रमाच्या प्रभावामुळे, इगतपूरी येथील सेंट्रल किचनचा परवाना अन्न सुरक्षा विभागाने निलंबित करुन आदिवासी शाळकरी मुलांच्या आरोग्यास सुरक्षिततेचा विशेष विचार करण्यात आला.पालघर जिल्ह्यातील आश्रमशाळा व वसतिगृहातील विद्यार्थ्यांना नियमितपणे नाष्टा व जेवण पुरविण्यात येत असून, अन्न सुरक्षा मानकांचे काटेकोर पालन करण्यासंबंधीचे प्रशिक्षण भविष्यात अन्न विषबाधा टाळण्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. या उपक्रमामुळे अन्न सुरक्षा व स्वच्छता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने एक नवा मानदंड स्थापन होईल असा विश्वास व्यक्त केला जातो.

# दागिने चोरणारी महिला गजाआड, पोलिसांकडून दागिने, रोकड, दुचाकी जप्त

■महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २ :

: घरकाम करण्याच्या बहाण्याने चोरी करणाऱ्या महिलेला चंदननगर पोलिसांनी अटक केली. महिलेकडून सोन्याचे दागिने, रोकड, तसेच दुचाकी जप्त करण्यात आली. महिलेकडून चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. ऋतुजा राजेश सुरुशे (रा. सेम्ब्ली चर्चजवळ, वडगाव शेरी) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत वडगाव शेरी भागातील एका महिलेने चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. तक्रारदार वर्षीय महिला फेब्रुवारी छत्रपती संभाजीनगर येथे कामानिमित्त गेल्या होत्या. त्या फेब्रुवारी रोजी गावाहून परतल्या. त्या वेळी घरातील कपाटातून ग्रॅम सोन्याचे दागिने आणि रोकड चोरून नेण्यात आल्याचे उघडकीस आले होते. महिलेने तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. तपासात तक्रारदार महिलेच्या घरात काम करणारी महिला ऋतुजा सुरुशे हिने चोरी केल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तिला ताब्यात घेतले. तिच्या घरातून ग्रॅम सोन्याचे दागिने आणि साडेपाच हजारांची रोकड जप्त करण्यात आली. चौकशीत सुरुशेने जुन्या मुंढवा रस्त्यावरील एका महिलेच्या घरातून ग्रॅम सोन्याचे दागिने आणि रोकड चोरून नेल्याचे उघडकीस आले.पोलिसांनी तिला अटक केली. पोलिसांनी तिच्याकडून सोन्याचे दागिने, रोकड, दुचाकी जप्त केली. पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव, सहायक आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली चंदननगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सीमा ढाकणे, सहायक निरीक्षक प्रशांत माने, उपनिरीक्षक अश्विनी पाटील, उपनिरीक्षक लक्ष्मण नवघणे, पोलीस कर्मचारी कळसाईत, गिरमे, काकडे यांनी ही कामगिरी केली.

# यंदा उजनीच्या पाण्याचा लवकरच उन्हाळा ?

■महासागर प्रतिनिधी
इंदापूर, दि. २ :

यावर्षीच्या पावसाळ्यामध्ये पूर्ण क्षमतेने शंभर टक्के भरलेले उजनी धरण गेल्या दोन महिन्यांतील बेसुमार पाणी वापराने अर्धे रिकामे झाले असून कडक उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच पाणीसाठा आज पन्नास टक्क्यांवर आला आहे.यावर्षीच्या पावसाळ्यामध्ये पूर्ण क्षमतेने शंभर टक्के भरलेले उजनी धरण गेल्या दोन महिन्यांतील बेसुमार पाणी वापराने अर्धे रिकामे झाले असून कडक उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच पाणीसाठा आज पन्नास टक्क्यांवर आला आहे. अशा पद्धतीने बेसुमार पाणी वापरल्यास उजनीच्या पाण्याचा ऐन उन्हाळ्यातच उन्हाळा होण्याची दाट शक्यता आहे.सध्या उजनी मध्ये केवळ सव्वीस टीएमसी पाणी चलसाठ्यात असून उन्हाळ्याच्या तोंडावर उजनीवर अवलंबून असलेले पाणलोट क्षेत्रातील शेतकरी उजनीच्या पाण्याच्या झळा आत्तापासूनच अनुभवत आहेत. याच पद्धतीने पाण्याचा वापर झाला तर ,लवकरच धरण मोकळे होण्याची भीती व्यक्त होत आहे.ऐन उन्हाळ्यात उजनीच्या पाण्याचा उन्हाळा होऊ लागल्याने उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.उजनीच्या पाण्याचा बेसुमार वापर थांबवावा. अशी आर्त हाक शेतकऱ्यांनी दिली असून आमच्या शेतीच्या उपसा सिंचन योजना व पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांचा विचार करून आता तरी उर्वरित पाण्याचे फेरनियोजन करा .अशी मागणी उजनी



धरणग्रस्थ शेतकऱ्यांतून पुढे आली असून पाणलोट क्षेत्रातील लोकप्रतिनिधी उजनीच्या पाण्याबाबत गप्प का ? असा सवाल विचारला जात आहे.यावर्षीच्या आगामी उन्हाळ्याची दाहकता वेळीच ओळखून , आहे ह्या पाण्याचे जबाबदारीने नियोजन न झाल्यास मोठ्या गंभीर समस्येला तोंड द्यावे लागणार आहे .याचे चित्र आता स्पष्ट दिसत आहे.सोलापूर, पंढरपूर, मंगळवेढा सांगोला व भीमा नदीच्या काठावरील पाणीपुरवठा योजना साठी उजनीतून भीमा नदीत आवर्तन सोडले जाते. एका आवर्तनाला सुमारे साडेपाच टीएमसी पाणी लागते .अशा प्रकारची दोन आवर्तने सोडली जातात. यामध्ये बारा टीएमसी पाणी नदीपात्रातून सोडले जाते .ही फार मोठी शोकांतिका आहे.सोलापूरला पिण्याच्या पाण्यासाठी उजनीतून समांतर जलवाहिनीचे काम गेले कित्येक दिवस सुरू आहे. मात्र अजूनही ते काम पूर्णत्वास आले नसल्याने उजनीच्या पाण्याचा फार मोठा अपव्यय होत आहे.उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रांमध्ये समाधानकारक पाऊस पडला तरच उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरते. अन्यथा अनेक वेळा उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरू शकत नाही.पवसाने ओढ दिली तर आषाढी एकादशीला पंढरपूरला उजनीतून पाणी सोडावे लागते. असे अनेक वेळा घडले असून हे अनुभव पदरी असताना त्या दृष्टीने पाण्याचे नियोजन होत नाही. असा आरोप उजनी धरणग्रस्तांमधून सातत्याने होत आहे.गतवर्षी उजनी धरण टक्के भरले होते .मात्र बेसुमार पाणी वापराची सवय लागल्याने ते पाणी पुरले नाही. मृत साठ्यातीलही साठ टक्के पाण्याचा वापर होऊन उजनी धरणाच्या गेल्या पंचेचाळीस वर्षाच्या इतिहासातील पाणीसाठ्याची निच्यांकी पातळीची नोंद झाली होती.या आठवणी ताज्या असताना सुद्धा उजनीच्या पाण्याचा बेसुमार वापर होत आहे .हा पाण्याचा वापर वेळीच रोखून उजनी धरणग्रस्तांच्या उपसा जलसिंचन योजनांना आठमाही ऐवजी बारमाही पाणी नियोजन करावे. अशी मागणी होत आहे.आता उजनीच्या पाण्याचा सुरुवातीपासूनच मोठा वापर सुरू झाला असल्याने दुष्काळाच्या खाईत उजनी धरणावर अवलंबून असलेल्या लोकांची वणवण लवकरच सुरू होण्याची चिन्हे दिसत आहेत. नीरा-भीमा नदी जोड प्रकल्पाचे काम सध्या सुरू आहे. हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर पुन्हा उजनीच्या पाण्याचा वापर वाढणार आहे.उजनीतील गाळ काढल्यास चार टीएमसी पाण्याची साठवण क्षमता वाढेल ,असे जाणकारांचे मत आहे.उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात नदी किनारी मोठ्या प्रमाणात शेतीच्या उपयुक्त माती आहे. गेले अनेक वर्षे शेतकरी ही माती उचलून माळरानाची शेती गाळमाती भरून तयार करीत होते. यातूनच धरणाच्या पाण्याची साठवण क्षमता वाढण्यासाठी मदतच होत होती.मात्र आता शासनाने नव्याने गाळमुक्त धरण जलयुक्त शिवार ही योजना आणली आहे.

उजनी धरण पाणलोट क्षेत्रात या योजनेला गती आली तर , उजनीच्या पाणीसाठ्यात समाधानकारक वाढ होणार आहे. याशिवाय उजनी धरणामध्ये मोठ्याप्रमाणामध्ये वाळूचा साठा उपलब्ध आहे. वाळू माफिया सातत्याने या वाळूचा उपसा करत असतात .

मात्र, शासनाने तातडीने उजनीतील वाळूच्या बाबतीमध्ये ठोस निर्णय घेऊन कार्यवाही करावी अशी मागणी होत आहे. उजनीतील वाळू साठा मोठ्या प्रमाणामध्ये बाहेर काढल्यानंतर उजनी धरणाच्या पाणी साठ्यामध्ये मोठी वाढ अपेक्षित आहे.

# तरुणीवर दोन जणांकडून अतिप्रसंग, आरोपींना अटक

■महासागर प्रतिनिधी
शिरुर, दि. २ :

कारेगाव , ता शिरुर येथे रात्रीच्या वेळी मामेभाउ व बहिण असे दोघे गप्पा मारत असताना दोन जणांनी त्यांना चाकूचा धाक दाखवून मारहाण करत तरुणीकडील सोन्याचे दागिने काढून घेऊन तीच्यावर दोघा जणांनी अतिप्रसंग केल्याची दुर्दैवी घटना घडली. याप्रकरणी अमोल नारायण पोटे (वय ) रा. संस्कृती डेव्हलपर्स पवार बिल्डींग, कारेगाव ता. शिरुर जि. पुणे मुळ (रा. ढोकराई फाटा, ता. श्रीगोंदा जि. अहील्यानगर) आणि किशोर रामभाऊ काळे (वय ) रा. संस्कृती डेव्हलपर्स, लेन नं., कारेगाव ता. शिरुर जि.पुणे मुळ (रा. किल्ले धारूर, ता.धारुर जि. बीड) अशा दोन आरोपींना पोलीसांनी अटक केली आहे.यासंदर्भात पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार संबधित तरुणी आणि तिचा मामेभाऊ रात्रीच्या वेळी घराच्या काही अंतरावर गप्पा मारत बसले होते. त्यावेळी दोन जण आले. त्यांनी संबधित तरुणी आणि तिच्या मामे भावाला त्यांच्याकडील चाकूचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली. जबरदस्तीने एकमेकांना चुंबन व शरीर संबध करण्यास भाग पाडले आणि त्यांच्याकडील मोबाईलमध्ये फोटो व व्हिडीओ शुटींग काढून घेतले. त्यानंतर संबधित तरुणीच्या मामे भावाला त्यातील एकाने थोड्या अंतरावर नेले आणि त्यापैकी एकाने पीडितेवर अतिप्रसंग केला. त्याच्यानंतर दुसऱ्याला बोलावून घेऊन पहिला युवक मामेभावाकडे गेला. त्यानंतर दुसऱ्याने संबधित तरुणीवर अतिप्रसंग केला आणि तरुणीच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरी करून निघून




गेले.या नंतर संबधित तरुणीने घरी जाऊन घडलेला सर्व प्रकार बहिणीस सांगितला. बहिणीच्या पतीने डायल वर कॉल करुन सदर प्रकारची माहीती पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी आरोपी अमोल नारायण पोटे आणि किशोर रामभाऊ काळे या दोघांना ताब्यात घेतले. या घटनेचा तपास पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली केला जात आहे. आरोपीना शिरुर न्यायालयात हजर केले असता मार्च पर्यंत पोलिस कोठडी सुनावली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी दिली .

# नदी पुनरूज्जीवन की पुरांची शाश्वत हमी ?

■महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २ :

गुजरातमधील साबरमती नदीच्या धर्तीवर पुण्यातील मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरण योजना राबविण्याचा मनसुबा पुणे महापालिकेत मध्ये सत्तेवर आलेल्या भारतीय जनता पक्षाने व्यक्त केला आणि नंतर प्रत्यक्ष कामही सुरू झाले.

तब्बत हजार कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी योजनेवर अनेक आक्षेप उपस्थित होत आहेत.

मात्र, त्यानंतरही या योजनेसाठी भाजप आणि महापालिका प्रशासनाने आग्रही भूमिका घेतली आहे. या योजनेचे सर्व पैसे करदात्यांच्या खिशातून जाणार आहेत.

# इंदापूर तहसील कार्यालयातील लाचखोर महिला कर्मचाऱ्याला पकडले, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

■महासागर प्रतिनिधी
पुणे दि. २ :

इंदापूर तहसील कार्यालयात केलेल्या अर्जावर तहसीलदारांची सही घेण्यासाठी एकाकडून हजारांची लाच घेणाऱ्या महिला कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) पकडले. याप्रकरणी महिलेविरुद्ध इंदापूर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.याप्रकरणी कावेरी विजय खाडे (वय ) हिच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खाडेविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली. याबाबत एकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. इंदापूर परिसरातील मौजे भांडगाव तक्रारादाच्या वडिलांची गुंठे जमीन आहे.

जमिनीच्या परिसरात रस्ता तयार करण्यासाठी परवानागी मिळावी, असा अर्ज तक्रारदाराने इंदापूर तहसील कार्यालयात अर्ज केला होता. या अर्जावर सुनावणी झाली. अंतिम आदेशावर सही घेण्यासाटी तहसीलदारांची सही घेण्यासाठी तहसील कार्यालयातील महसूल सहायक खाडे हिने तक्रारदाराकडे हजार रुपयांची लाच मागितली. त्यानंतर तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली, अशी माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.तक्रारदाराला खाडेने लाचेची रक्कम घेऊन तहसील कार्यालयात शुक्रवारी बोलाविले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा लावून खाडेला तक्रारदाराकडून हजारांची लाच घेताना पकडले. पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त अधीक्षक डॉ. शीतल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक प्रेम वाघमोरे तपास करत आहेत. शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्याने लाच मागितल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (दूरध्वनी–, ) तक्रार द्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी केले आहे.



# महीला पोलीस व पोलीस कुटुंबियांनी स्वत:चे शरीराची काळजी घ्यावी



## सिनेअभिनेता स्वप्नील जोशी यांची उपस्थिती

■अकोला,दि.२ (प्रतिनिधी):

पोलीस दलातील पुरुष हे नेहमीच कर्तव्या करीता फिल्डवर बाहेर असतात त्यावेळी त्यांचे कुटूंबिय हे दैनंदीन कामकाज व गुलांच्या संगोपनात व्यस्त असल्याने त्यांच्या आरोग्यावर दुर्लक्ष होते ही बाब लक्षात घेवून पोलीसांच्या कुटूंबियातील महीला सदस्यांमध्ये तसेच महीला अधीकारी व अंमलदार यांच्या आरोग्या विषयी जागृती निर्माण व्हावी म्हणुन अकोला पोलीस दलातर्फे जागतीक महिला दिनाचे पार्श्वभुमीवर दिनांक ०२/०३/२०२५ रोजी वॉकथॉन २०२५ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी चांगले आरोग्य हे काळाची गरज आहे. शारीरीक तंदुरुती आपल्याला मजबुत, सक्रीय आणि कोणत्याही आव्हानांना सामना करण्यास तयार ठेवते, तर मानसिक निरोगीपणा, लवचिकता, लक्ष केंद्रीत आणि भावनिक सामर्थ्य सुनिश्चित करते. तंदुरुस्त राहण्यासाठी चालणे हा सर्वात सोपा पण प्रभावी मार्ग आहे.

ते शरीरीला टवटवीत करून मन स्वच्छ करते आणि बंध मजबुत करते अशा प्रकारे एकत्रित चालण्याने पोलीस समुदायामध्ये एकत्र, काळजी आणी समर्थनाची भावना अधिकच मजबुत होते. एक निरोगी आणि आनंदी कुटुंब असाव या करीता या वॉकथॉनचे आयोजन करण्यात आले होते. असे मा. पोलीस अधीक्षक श्री बच्चन सिंह यांनी आपले मत व्यक्त केले.प्रमुख पाहुण्यांच्या स्वागताने कार्यक्रमाची सुरुवात झाली आर. जे. श्रीच्या बहारदार सुत्रसंचलानामुळे वॉकथॉन करीता महिलांचा उत्साह वाढला.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झेंडी दाखवुन वॉकथॉनला सुरूवात झाली वॉकथॉन दरम्यान महिलांमध्ये उत्साह होता सकाळचे आल्हाददायक वातावरण व रस्त्यावर लावलेल्या म्युझीक ट्रॉली मुळे महिलांनी गाण्याचा व नाचण्याचा आनंद लुटला, सोबतच गप्पा गोष्टी करत चालत राहा बोलत राहा या वॉकथॉनच्या थिम प्रमाणे महिलांनी आनंद व्यक्त केला. आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सिने अभिनेते श्री स्वप्नील जोशी यांचे सोबत फोटो काढण्याचा मोह महिलांना आवरला नाही आणि त्याला पाहुण्यांनी सुध्दा मोठया प्रमाणात प्रतिसाद दिला.

यावेळी प्रमुख पाहुणे सिनेअभिनेते श्री. स्वप्नील जोशी पोलीस कुटुंबीयासोबत संवाद साधतांना मला अत्यंत आनंद होत आहे व जगातले खरे हिरो हे वर्दीतले हिरो आहेत असे मत व्यक्त करून त्यांनी पोलीस दलातील महिला अधिकारी / अंमलदार यांना आरोग्याविषयी काळजी घेण्याचा सल्ला दिला.

पोलीस कुटुंबीयामध्ये अशा प्रकारचा कार्यक्रम प्रथमच आयोजीत केल्यामुळे उत्साह, आनंद दिसुन आला. तसेच संकल्प बॅड पथकाने सुध्दा आपली हजेरी लावुन त्यामध्ये विशेष भर टाकली. वॉकथॉन करणाऱ्या महिलांना विशिष्ट टि शर्ट, कॅप आकर्षक दिसत होत्या त्यानंतर त्यांना वॉकथॉन पूर्ण केल्याबद्दल मेडल देवुन सन्मानीत करण्यात आले तसेच त्यांना वॉकथॉन संपल्यानंतर महिलांनी रिफेरशमेंट म्हणुन अल्पोहारचा आस्वाद घेतला. अकोला पोलीस दलातील तसेच कुटुंबातील २३०० महिलांनी या कार्यक्रम मध्ये सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाकरीता सुप्रसिध्द मराठी अभिनेते स्वप्नील जोशी सोबतच सौरभ गाडगीळ (पि. एन. जी ज्वेलर्स) यांचे प्रमुख उपस्थिती होती तसेच गा. श्री.सुनिल लहाणे, ग.न.पा आयुक्त, अकोला, मा. श्री.योगेश कुंभेजकर, एम.डी महाबीज, मा.श्री.डॉ. कुमारस्वामी, उप वनसंरक्षक, अकोला,मा. श्री. बच्चन सिंह पोलीस अधीक्षक, अकोला त्यांच्या कुटुंबीयासह उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजनाचे यशस्वीतेसाठी श्रीमती. सिरिशा बच्चन सिंह, पो. नि. वैशाली मुळे, पो. नि. उज्वला देवकर यांच्या यांचे सहयोगाने अपर पोलीस अधीक्षक श्री अभय डोंगरे, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व ठाणे प्रभारी अधिकारी व शाखा अधिकारी यांनी जिल्हयातील सर्व महिला अंगलदार व पोलीस कुटुंबियातील महिला यांना हजर ठेवण्यासाठी नियोजन व प्रयत्न केले.

## थोडक्यात

### विवेकानंद इंग्लिश शाळेत राजभाषा दिवस

**अकोला :** स्थानिक तापडिया नगरस्थित विवेकानंद इंग्लिश कॉन्व्हेट येथे मराठी राजभाषा दिवस साजरा करण्यात आला. प्रारंभी विद्येची देवता सरस्वती व लेखक वि.वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन मुख्याध्यापिका संगिता कोकीळ यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनी तृप्ती लहासे व तन्वी मोहोड यांनी भाषण, उज्वला घुले आणि गटाद्वारे 'विंचू चावला' भारुड सादर केले. आठवीची कृष्णाली चिंचोलकर हिने दिग्दर्शित केलेली 'पाल चिकटली' स्त्री दाक्षिण्य व अंधश्रद्धेबाबत समाजप्रबोधन करणारी नाटिका आकर्षण ठरली. वर्ग ५ वी ते ८ वीच्या इश्वरी भांगे, संस्कृती देशमुख, शर्वरी पल्हाडे, संस्कृती थोटे, तनुश्री पिंजरकर, कृश्णाई गावंडे, केतकी देशपांडे, वेदिका सैतवाल, वेदा पांडे, तेजश्री झापर्डे, आयुश देशपांडे या विद्यार्थ्यांनी मराठी गीते सादर केली. विघ्नेश बोकसे याने तबल्यावर उत्तम साथ दिली. कार्यक्रमाचे संचालन स्वरांजली बढे, रिधिमा काळे, संस्कृती अंभोरे, तेजल बेंडे, स्वरा गुढे, प्रेरणा पाटेकर या मुलींनी केले. आभार प्रदर्शन रेवती कदम व कृष्णाली ढेंगे यांनी केले. मराठीच्या शिक्षिका ज्योती पांडे, शितल तळपदे यांचे आयोजनात मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलांचे कौतुक संस्थेचे अध्यक्ष अनिल पिंपरखेडे, सचिव रविंद्र अभ्यंकर, मुख्याध्यापिका संगीता कोकीळ, पर्यवेक्षिका मिनल कापसे, नयना हातवळणे यांनी केले.

### पीसीपीएनडीटी कायद्याच्या अंलबजावणीसाठी मार्गदर्शन

**अकोला :** आरोग्य विभागाच्या वतीने 'पीसीपीएनडीटी' अंतर्गत समुचित प्राधिकारी यांचे करिता विभागीय कार्यशाळा उपसंचालक यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. कार्यशाळेचे उदघाटन उपसंचालक डॉ. कमलेश भंडारी यांच्या हस्ते झाले. सहाय्यक संचालक डॉ. आरती कुलवाल यांनी उपस्थिताना एमटीपी कायदा व एआरटी आणि सरोगसी कायदा यावर मार्गदर्शन केले. सहाय्यक शासकीय अभियोक्ता ॲड. पंकज माहोरे यांनी उपस्थितांना पीसीपीएनडीटी कायद्याबाबत माहिती दिली तसेच पंचनामा करताना घ्यावयाची दक्षता व नियम याबाबत मार्गदर्शन केले. 'सहाय्यक पोलीस निरीक्षक महिला सेल वाशिम यांनी स्टिंग ऑपरेशन दरम्यान जबाब कसे नोंदवावे याबाबत मार्गदर्शन केले तर पोलिस निरीक्षक शंकर शेळके, मनीषा तायडे यांनी स्टिंग ऑपरेशन करताना ऑडिओ व्हिडिओ पुरावा कसा घेण्यात यावा याबाबत मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेला अकोला वाशिम यवतमाळ, बुलढाणा, अमरावती येथील जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी तसेच सर्व तालुक्यातील वैद्यकीय अधीक्षक, विधी समुपदेशक हे उपस्थित होते. कार्यशाळेमध्ये सन २०२४-२५ या वर्षात केलेल्या यशस्वी कारवाईकरीता जिल्हा पथकाना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

## न्यायदान कक्षासमोर शांतता भंग करणाऱ्या एक हजार रुपये दंड

■अकोला,दि.२ (प्रतिनिधी):

अकोट येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्यायदान कक्षासमोर मोठमोठ्याने बोलून शांतता भंग करणाऱ्या संजय



आठवले यास न्यायालयाने एक हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. आठवले हा कोर्ट कामाच्या निमित्याने वकीलाला भेटण्यासाठी अकोट न्यायालयात गेला होता. त्या ठिकाणी चंद्रशेखर भारब्दे हा भेटला असता त्या ठिकाणीच आठवले हा त्यांच्यासोबत मोठमोठ्याने बोलत होता. सदर वेळी न्यायदान कक्षात एका खटल्याचे निकाल तयार करणे सुरु होते. होत असलेल्या शांततेच्या भंगामुळे संतापलेल्या जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी सुरक्षा रक्षक व पोलिस यांना शांतता भंग करणाऱ्यास ताब्यात घेवून हजर करण्यास सांगितले. आदेशानुसार त्याला न्यायाधीशासमोर उभे केले असता त्याने केलेला प्रमाद त्याला सांगितल्यानंतर आठवले याने कोर्टाची क्षमा मागीतली. तथापी न्यायालयाने त्यास एक हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

## रामदेवबाबा-श्यामबाबा मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद

### भजनकार उमेश शर्मा यांची भव्य भजन संध्या संपन्न



■अकोला,दि.२ (प्रतिनिधी):

स्थानीय गीता नगर परिसरातील रामदेवबाबा-श्यामबाबा मंदिरात मंदिराचा सातवा प्राणप्रतिष्ठा महोत्सव प्रारंभ झाला असून त्या निमित्त आयोजित दहा दिवसीय कार्यक्रमास भक्तांचा उत्स्फ्रूर्त प्रतिसाद मिळत आहे.फ्राल्गुन सुदी दुज शनिवार पासून हा महोत्सव पूजन व आरती समवेत प्रारंभ झाला. यात मंदिर सुंदरपणे सजवल्या गेले असून विशेष सजावट कलाकार रंगीबेरंगी विद्युत रोषणाई करत आहेत.या उत्सवात भजन गायक उमेश शर्मा डब्बू व गायिका कु. नेतल शर्मा यांची भव्य भजन संध्या संपन्न झाली.यात उमेश शर्मा यांनी सुंदर संगीतमय भजने सादर करीत भक्तिभाव निर्माण केला.समिती च्या वतीने सर्वप्रथम भजन गायक उमेश शर्मा यांचे स्वागत करण्यात आले.उत्सवात दि४ मार्च रोजी साय ७ वाजता राम दरबार सुंदरकांड गुपच्या वतीने मंदिर प्रांगणात सुंदरकांड आयोजित करण्यात आले आहे.शनिवार दि ८ व रविवार दि ९ मार्च रोजी गायिका सौ निधी मंत्री व इंदूर येथील कलाकारांचे नृत्यनाट्य व भजन संध्या आयोजित करण्यात आली आहे.दि १० मार्च रोजी सकाळी ८ वाजता राणी सती धाम ते मंदिरापर्यंत शेकडो भाविकांसह श्याम बाबांची भव्य पायी निशान यात्रा आयोजित करण्यात आली आहे.या दिनी सायंकाळी ७ वाजता इंदूरच्या प्रसिद्ध गायिका गौरी अग्रवाल यांची श्यामबाबावर आधारित भव्य भजन संध्या होणार असून यात होली नृत्य होणार आहे.दि १० मार्च पर्यंत सुरू असलेल्या या महोत्सवाचा सर्व महिला पुरुष भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन रामदेव बाबा-श्यामबाबा मंदिर सेवा समिती ने केले.

## धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने स्वच्छता मोहीम



■अकोला,दि.२ (प्रतिनिधी):

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा जिल्हा रायगडच्या वतीने महानगरात रविवारी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात स्थानिक १५० स्वयंसेवक सहभागी झाले होते.यात मनपाच्या वतीने क्षेत्रीय सहा आयुक्त दिलीप जाधव यांनी सहभाग घेतला. स्वच्छ भारत अभियान राज्यपाल नियुक्त स्वच्छता दूत डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण राज्यात रविवारी हे अभियान राबविण्यात आले. महानगरात मानव शोरूम समोरील स्मशानभूमी परिसरात हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये स्मशानभूमी परिसर पूर्णपणे स्वच्छ करण्यात आला. या अभियानात स्थानिय कार्यकर्ते, मनपाच्या स्वच्छता विभाग समवेत वाशिम, मेहकर, तेल्हारा, हिंगोली येथील सदस्य सुद्धा सहभागी झाले होते.डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान हे सेवाभावी समाजभिमुख उपक्रम राबविणारे प्रतिष्ठान असून या स्वच्छता अभियानात नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले.

## संप्रदायिक काला हे बंधुभावाचे प्रात्यक्षिक : श्री विठ्ठल महाराज कोरडे

■अकोला,दि.२ (प्रतिनिधी):

भारताच्या एकात्मिकता व अखंडिततेकरिता सर्व भेदभाव विसरून अखिल मानव जातीच्या कल्याणार्थ, देश व संस्कृती रक्षणाचा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून, जातीयता स्पृशास्पृष्य भेदाभेदांच्या विषारी विळख्याला बाजूला सारून, सुसंघटित ,सुदृढ व संस्कारक्षम मानवनिर्मितीर्थ कलियुगात खऱ्या बंधुभावाचे प्रात्यक्षिक घडवून आणणारा वारकरी संप्रदायातील काला होय. असे गौरव पूर्ण उद्गार संत श्री वासुदेव महाराजांचे कृपांकित श्री विठ्ठल महाराज कोरडे यांनी काढले.



ते आज श्री संत वासुदेवजी महाराज स्मृती मंदिर श्री ज्ञानेश आश्रम वारी भैरवगढ येथील ज्ञानयज्ञ सप्ताहाच्या समारोपीय काल्याच्या किर्तन प्रसंगी बोलत होते . ते पुढे म्हणाले की , लीला पुरुषोत्तम भगवान श्रीकृष्णांनी गोकुळ लीला करीत असतांना अठरापगड जातीच्या बालगोपाळांचे उत्कृष्टरित्या संघटन करून शारीरिक दृष्ट्या अत्यंत कमजोर असणाऱ्या गोपाळांना दही, दूध, तूप, लोणीआदि सकस आहार देत आट्यापाट्या, लगोरी, चेंडू दांडू , ढाबाधुबी , पटपट सावली , कुस्ती, डाबडुबली आदि खेळांचे संत वाययातील प्रमाणे आपल्या सुमधुर आवाजाने गाऊन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

तसेच त्यांचे महत्त्व विशद करताना सांगितले की, भगवंतांनी मर्दानगी खेळ खेळून त्यांचे मन , मेंदू आणि मनगट मजबूत करण्याचे काम केले. गोकुळातील केवळ पैशाकरिता मथुरे विक्रीकरिता जात असणाऱ्या सकस आहाराची चोरी व नाकाबंदी करून भगवान श्रीकृष्णांनी देव, धर्म व संस्कृती रक्षणाकरिता चोरी व स्वारी करणे पाप नाही असा दिव्य संदेश दिला. तसेच भगवंताच्या चोरी मागील अध्यात्म,धर्म, भक्ती व राजकारणाचे सप्रमाण रहस्योद्घाटन सुद्धा महाराजांनी यावेळी केले. तसेच भागवताचार्य श्री ज्ञानेश्वर महाराज वाघ यांच्या कार्याचे तोंड भरून कौतुक केले.तदनंतर भव्य महाप्रसादाच्या कार्यक्रमाने सप्ताहाची निर्वीघ्नपणे सांगता झाली. असे श्री ज्ञानेश्वर महाराज भालतिलक हे कळवतात.

## महानगरात मातृशक्ती सन्मान पुरस्कार सोहळ्याचे आयोजन

### यंग इंडिया बिझनेस क्लबचा उपक्रम

■अकोला,दि.२ (प्रतिनिधी):

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त संपूर्ण देशातील उद्योग आणि व्यवसायासाठी पुरूष आणि महिलांना कमी वेळात पुरेसे मार्गदर्शन आणि पुढाकार देण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या शहरातील यंग इंडिया बिझनेस क्लबने समाजातील सर्व घटकांमधील स्वावलंबी आणि स्वतःचे जग निर्माण करणाऱ्या महिला शक्तीसाठी पुरस्कार सोहळा आयोजित केला.

जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला दि ७ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता, राधाकिशन प्लॉट परिसरातील माहेश्वरी भवन येथे आयोजित या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय रेल्वे व्यवस्थापक भुसावळ इती पांडे, मिसेस इंडिया २०१९च्या रूपल मोहता उपस्थित राहणार आहेत.भुसावळ जंक्शनच्या विभागीय रेल्वे व्यवस्थापक इती पांडे या महिला विश्वातील सर्वात सक्रिय



नाव असल्याचे म्हटले जाते. इती पांडे यांनी जागतिक कीर्तीची कामगिरी केली आहे. या समारंभात उद्योग, व्यवसाय, संस्कृती, समाज, धर्म, वैद्यक, शिक्षण, कला, क्रीडा इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना पदक देऊन सन्मानित केले जाईल. या समारंभात महिला प्रतिभा प्रदर्शन, नृत्य, मिमिक्री, वेशभूषा इत्यादी कार्यक्रम सादर केले जातील. गेल्या वर्षी क्लबने सुमारे ११५ महिलांना सन्मानित केले होते, ज्यात ड्रायव्हर, भाजी विक्रेते, कामगार, भांडी धुणाऱ्या कामगार महिला आणि व्यवसाय, उद्योग, शिक्षण, संस्कृती आणि समाजसेवेत सहभागी असलेल्या महिलांचा समावेश होता.या वर्षीही हीच संकल्पना क्लबकडून जोपासल्या जात आहे.

या समारंभाची तयारी सुरूझाली आहे. या मातृशक्ती सन्मान सोहळ्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले असल्याची माहिती क्लबचे व्यवस्थापकीय संचालक ॲड. देवेंद्र अग्रवाल व चेअरमन रमाकांत खेतान यांनी दिली.

## जिल्ह्यात फेब्रुवारीतच पाणीटंचाईचा गंभीर प्रश्न !

■अकोला,दि.२ (प्रतिनिधी):

महिन्यातच फेब्रुवारी पाणीटंचाईचा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. ग्राम ीण भागातील अनेक गावांत विहिरी कोरड्या पडू लागल्या असून, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. प्रशासनाने काही ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला असला तरी अनेक गावांमध्ये अद्यापहीपुरेसा पर्याय उपलब्ध नाही. गेल्या काही वर्षांपासून अकोला जिल्ह्यातील भूजल पातळी सातत्याने खालावत आहे. यंदा पावसाने समाधानकारक हजेरी लावली असली तरी डिसेंबरनंतर पाणीसाठे वेगाने आटू लागले आहेत.

## जमिनीचे पट्टे, घरकुलांसाठी धरणे

■अकोला,दि.२ (प्रतिनिधी):

जिल्हयातील सर्व गायरानधारकांना त्यांच्या जमिनीचे कायम पट्टे मिळणेसाठी तसेच सरकारी जागेम ध्ये ३० ते ४० वर्षापासून राहत असलेल्या लोकांना त्यांच्या नावे ८ अ नमुना ड नुमना नसल्यामुळे त्यांना शासनाच्या घरकुलाचा लाभ मिळालेला नाही तसेच सरकारी गायरान जमिनीमध्ये ३० ते ४० वर्षापासून वहिती करून त्यावर पिके घेत आहेत, गावरान जमिनीचे पट्टे व घरकुलासाठी जिल्हाधिकारी कार्यालया समोर सोमवारी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.शासन निर्णय दि. २२ एप्रिल ९२ दि. १४ एप्रिल९० मध्ये अस्तित्वात असलेली अतिक्रमणे नियमनाकुल करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी तात्काळ सुनावणी करून अतिक्रमणधारकांना त्यांच्या नावे नियमाप्रमाणे तात्काळ कारवाई करून त्यांना कायम पट्टे देण्यात यावे तसेच झोपडपट्टी धारकांच्या बाबत शासन निर्णय २७ ऑगस्ट १९ नुसार सरकारी जागा नावे करून त्यांना त्वरीत घरकुल मंजूर करून त्याचा लाभ द्यावा. यासाठी शिंदे शिवसेना मागासवर्गीय विभाग प्रमुख जे. पी. सावंग यांच्या नेतृत्वात विदर्भ प्रमुख भाई सावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत धरणे आयोजित करण्यात आले आहेत.या आंदोलनात सर्व कागदपत्रासह सहभागी व्हावे असे आवाहन अकोला जिल्हा प्रमुख जे. पी. सावंग, ॲड अमोल गवई, कार्याध्यक्ष बाळासाहेब दामोदर उपस्थित होते.

# भारताचे माननीय उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी भारतीय कॉर्पोरेट्सना विशेष शैक्षणिक संस्थांमध्ये गुंतवणूक करण्याचा आग्रह केला




**मुंबई, २ मार्च :** शिक्षण क्षेत्रातील कारकिर्दीला ७५ वर्षे पूर्ण केल्याचे औचित्य साधून हिंदुजा समूहाने आपली प्रमुख संस्था हिंदुजा कॉलेज ऑफ कॉमर्समार्फत भारताच्या भविष्याला आकार देण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे. हिंदुजा कॉलेज ऑफ कॉमर्सची सुरुवात शरणार्थींच्या मुलांसाठी सुरु करण्यात आलेले एक सामान्य प्राथमिक विद्यालय म्हणून झाली होती. आज ६००० पेक्षा जास्त विद्यार्थी याठिकाणी शिक्षण घेत आहेत आणि हिंदुजा कॉलेज ऑफ कॉमर्स आता एक डीम्ड युनिव्हर्सिटी बनण्याच्या दिशेने पुढे जात आहे.

आज हा समूह हिंदुजा फाउंडेशनच्या माध्यमातून 'रोड टू स्कूल' आणि 'रोड टू लाईवलीहूड' या उपक्रमांमध्ये भारतभर ७,००,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शिक्षण प्रदान करत आहे. २०३० सालापर्यंत १ मिलियन विद्यार्थ्यांना सक्षम बनवण्याच्या योजनेसह हिंदुजा फाउंडेशन शिक्षणामध्ये परिवर्तनाचा मुख्य स्रोत बनून सातत्याने प्रोत्साहन देत आहे आणि २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्याच्या भारताच्या दृष्टिकोनामध्ये प्रमुख योगदान देत आहे.

या समारोहाचे प्रमुख अतिथी म्हणून भारताचे माननीय उपराष्ट्रपती श्री जगदीप धनखड आणि त्यांच्यासह अनेक इतर मान्यवर देखील उपस्थित होते. महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल श्री सी पी राधाकृष्णन देखील विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते. माननीय उपराष्ट्रपती श्री जगदीप धनखड यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या लक्षणीय शैक्षणिक आणि अभ्यासक्रमबाह्य यशासाठी सन्मानित केले.

हिंदुजा कॉलेजची ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या एका समारंभामध्ये विद्यार्थी आणि मान्यवरांना संबोधित करताना, भारताचे माननीय उपराष्ट्रपती श्री जगदीप धनखड म्हणाले, सनातन हा देशाच्या संस्कृतीचा व शिक्षणाचा भाग असला पाहिजे कारण हे समावेशकतेचे प्रतीक आहे आणि यामध्ये आपली मुळे घट्ट रुजलेली असावीत यावर भर दिला. त्यांनी कॉर्पोरेट इंडियाला आग्रह केला की त्यांनी विशेष संस्था निर्माण करण्यासाठी शिक्षणामध्ये गुंतवणूक करावी. परोपकारी प्रयत्न हे कमॉडिफिकेशन आणि व्यावसायीकरणाच्या सिद्धांतांनी प्रेरित नसावेत. आपल्या आरोग्य सेवा आणि शिक्षण प्रणाली याने ग्रस्त आहे. त्यांनी शिक्षण हे सर्वात प्रभावी परिवर्तनकारी तंत्र देखील आहे, जे समानता घडवून आणते. त्यांनी असा विश्वास व्यक्त केला की, हिंदुजा कॉलेज डीम्ड युनिव्हर्सिटी बनण्यापुरते मर्यादित राहणार नाही तर जागतिक प्रतिष्ठेची संस्था बनेल.

हा टप्पा पार केल्याबद्दल हिंदुजा फाउंडेशनचे अध्यक्ष श्री अशोक हिंदुजा म्हणाले, संस्था एक कौशल्य विकास केंद्र स्थापित करण्यासाठी सज्ज आहे, जे उद्योग आणि शिक्षणादरम्यानचे अंतर कमी करण्यासाठीची वचनबद्धता मजबूत करेल, त्यासोबतच डीम्ड युनिव्हर्सिटी बनण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या क्षमता अनेक पटींनी वाढवण्याच्या दीर्घकालीन योजना देखील आहेत. हे कॉलेज आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स आणि वेल्थ मॅनेजमेंटमध्ये नवीन कार्यक्रम सुरु करण्याची योजना तयार करत आहे, त्यासोबतच क्लायमेट फायनान्स आणि निर्यात आयात व्यवस्थापनामध्ये विशेष अभ्यासक्रम देखील सुरु करेल.

अशोक हिंदुजा यांनी सरकारकडून शिक्षणामध्ये सनातन सिद्धांतांचा समावेश करण्यावर विचार करण्याचा देखील आग्रह केला. या सूचनेशी सहमती दर्शविताना माननीय उपराष्ट्रपती म्हणाले, सनातन समावेशकतेला प्रोत्साहन देते.

हिंदुजा फाउंडेशनचे अध्यक्ष श्री पॉल अब्राहम म्हणाले, हिंदुजा कॉलेजमध्ये पुनर्विकास केला जात आहे, अत्याधुनिक पायाभूत संरचना आणि आधुनिक सुविधांनी सज्ज असलेली अत्याधुनिक, अनेक मजल्यांची सुविधा तयार केली आहे. आशा आहे की, ही महत्त्वाकांक्षी योजना २०२ पर्यंत पूर्ण होईल. आम्हाला आशा आहे की, नवीन सुविधा कॉलेजच्या भौतिक क्षमता तीन पटींनी वाढवेल जेणेकरून संधींच्या एका स्पेक्ट्रममध्ये डिजिटल आउटरीच आणि प्रोग्रामिंगच्या क्षमता वाढवल्या जाऊ शकतील.

कॉलेजचे व्हिजन स्पष्ट आहे: आमच्या विद्यार्थ्यांना फक्त उत्कृष्टतेसाठी नाही तर इतरांपेक्षा पुढे जाण्यासाठी सशक्त बनवणे. विद्यार्थ्यांना सशक्त बनवण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचा हा एक भाग आहे.

# एक अभिनेता म्हणून भगवान शंकराची भूमिका करणे माझ्या अंगवळणी पडले आहे : तरुण खन्ना



**मुंबई, २ मार्च :** प्रसिद्ध अभिनेता तरुण खन्ना सोनी सबवरील बहुप्रतीक्षित मालिका वीर हनुमानच्या कलाकार संचात दाखल झाला आहे. तो तब्बल ११ व्यांदा भगवान शंकराची भूमिका करत आहे. ११ मार्च रोजी रात्री ७.३० वाजता सुरू होत असलेल्या या मलिकेत हनुमानाची दिव्य कहाणी पडद्यावर जिवंत होणार आहे. बाल हनुमानापासून ते स्वतः शक्तींची ओळख पटेपर्यंतचा हनुमानाचा प्रवास यात चित्रित केलेला असेल. यातील वेधक कथानक आणि जबरदस्त व्यक्तिरेखा यामुळे ही मालिका प्रेक्षकांना नक्कीच खूप आवडेल आणि ती प्रेक्षकांना आध्यात्मिक अनुभव देईल.

तरुण खन्ना हे पौराणिक मालिकांमधील चिरपरिचित नाव आहे. नुकतीच त्याने श्रीमद् रामायण मालिकेत भगवान शिवाची भूमिका केलेली सर्वांनी पाहिली आहे. या पठडीतील त्याच्या मोठ्या अनुभवामुळे त्याला मिळालेली प्रत्येक व्यक्तिरेखा सुंदर पद्धतीने निभावण्याची हातोटी त्याने साधली आहे. वीर हनुमान मालिकेतील त्याचा परफॉर्मन्स प्रेक्षकांना नक्कीचफ आवडेल. हनुमान हा भगवान शिवाचा अंश होता असे मानले जाते.

महाशिवरात्रीच्या संदर्भात तरुण खन्ना म्हणतो, भगवान शंकराची भूमिका करताना नेहमीच गौरव वाटतो. पण वीर हनुमान खूप खास आहे. शिव आणि हनुमान यांच्यातील घनिष्ठ संबंधाचा शोध घेणे हा एक संपूर्ण वेगळा पैलू आहे. त्यामुळे ही भूमिका आणखी दमदार आणि भावनिक होऊ शकते. या मालिकेतील दिव्य ऊर्जा आणि त्यातील आध्यात्मिक गुण प्रेक्षक कधी अनुभवतात, असे मला झाले आहे.

# सोनीसबवरील वागले की दुनिया मालिकेत अथर्व राजेशच्या प्रिमॉनिशन शक्तीचा स्टॉक टिप्ससाठी गुपचुप उपयोग करतो



**मुंबई, २ मार्च :** सोनीवरील वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिकेला एक वेगळेच वळण मिळाले आहे. अथर्व (शीहान कपाही) हर्षद (अमित सोनी)ला स्टॉक टिप्सद्वारे मदत करण्यासाठी राजेश (सुमित राघवन)च्या प्रिमॉनिशन शक्तीचा गुपचुप उपयोग करतो. राजेशला या सगळ्या प्रकाराचा पत्ताच नाही आहे, तर हर्षद नशीब आपल्या बाजूने फिरवण्यासाठी उत्सुक आहे त्यामुळे तो या तथाकथित भाकितावर विसंबून राहू लागतो. सुरुवातीला यश मिळाल्यामुळे हर्षदची हाव वाढते. तो अथर्वला अशीच मदत करत राहण्यासाठी गळ घालतो. अशाप्रकारे ही साखळी सुरू राहते आणि त्यांच्या नियंत्रणाबाहेर जाते.

आगामी भागांमध्ये, या व्यवहाराला एक भयंकर वळण मिळते. सुरुवातीच्या यशामुळे हर्षदचा आत्मविश्वास वाढून तो आणखी लोकांना यात सामील करून घेतो. आणि जास्त पैसे गुंतवतो. पण स्टॉक मार्केटचा भरवसा देता येत नाही आणि जेव्हा गोष्टी बिनसतात तेव्हा कल्पना केली नसते, इतके प्रचंड नुकसान होते. विश्वास आणि आर्थिक स्थिरता या दोन्ही गोष्टी पणाला लागतात आणि सत्य कधी ना कधी बाहेर येईलच अशी परिस्थिती निर्माण होते.

राजेशला हा सगळा प्रकार समजेल का? त्याला समजल्यानंतर त्याची प्रतिक्रिया कशी असेल?

राजेश वागलेची भूमिका करणारा सुमित राघवन म्हणतो, राजेशचा पहिल्यापासून परिश्रम आणि प्रामाणिकपणा यावर भर आहे. त्यामुळे आपला मुलगा वैयक्तिक लाभासाठी आपल्या शक्तीचा गुपचुप उपयोग करत असल्याची कल्पना तो सहन करू शकणार नाही. चिंतेची बाब ही देखील आहे की, जेव्हा गोष्टी सुरळीत चालत असतात तेव्हा माणसाची हाव किती लगेच वाढते! हे कथानक निष्पापता आणि कावेबाजपणा यांच्यातील फरक सांगणारे आहे. चुकीच्या दिशेने उचललेले एक पाऊल किती भयंकर परिणाम देऊ शकते हे या कथेतून मांडले आहे. सत्य उघड होण्याचा क्षण नक्कीच धक्कादायक असणार आहे.

# साहित्य संमेलनात मर्सिडिज धावली...

तब्बल सत्तर वर्षांनी राजधानी नवी दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साजरे झाले. १९५४ मध्ये झालेल्या अ. भा. साहित्य संमेलनाचे उद्घाटन तत्कालिन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केले होते, तेव्हा स्वागताध्यक्ष काकासाहेब गाडगीळ होते. सन २०२५ मध्ये झालेल्या ९८ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले, स्वागताध्यक्ष माजी केंद्रीयमंत्री व माजी मुख्यमंत्री शरद पवार, तर संमेलनाध्यक्ष तारा भवाळकर होत्या. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे भाषण अप्रतिम झाले. देशभर त्याला ठळक प्रसिद्धी मिळाली. पण संमेलनातील अन्य भाषणे, परिसंवाद व इतर कार्यक्रम यांच्यापेक्षा राज्य विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केलेल्या वक्तव्याला अफाट प्रसद्धी तर मिळालीच पण त्यावरून मोठे राजकीय वादळ निर्माण झाले. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडिज दिल्यानंतर पद मिळते असे त्यांनी वक्तव्य केले. हा त्यांचा आरोप नव्हता किंवा त्यांनी संशयही व्यक्त केला नाही. विधान परिषदेवर त्या चार टर्म आमदार आहेत. उपसभापती म्हणून त्यांना कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा आहे. मग त्या खोटे बोलतीलच कशा? त्यांनी जे वक्तव्य केले, ते धादांत खोटे आहे असे कोणी म्हटलेले नाही पण उबाठा सेनेच्या पक्षप्रमुखांचा त्यांनी अवमान केला आहे अशी त्यांच्यावर मातोश्रीच्या गोतावळ्यातून टीकेची झोड उठवली जात आहे.

दिल्लीच्या साहित्य संमेलनात आम्ही असे घडलो, या विषयावर एक परिसंवाद योजला होता. प्रश्न विचारणारे ज्येष्ठ पत्रकार होते व त्याला उत्तर देणारे मुरब्बी राजकारणी होते. याच परिसंवाद बोलताना डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दोन मर्सिडिज दिल्यावर ठाकरेंच्या शिवसेनेत पदे मिळतात, असा थेट मातोश्रीवर हल्ला चढवला. या परिसंवादात माजी केंद्रीयमंत्री व माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व माजी केंद्रीयमंत्री सुरेश प्रभू यांनीही भाग घेतला होता, पण त्यांच्या बोलण्यातून कुठे वाद किंवा कटुता निर्माण झाली नाही. आम्ही असे घडलो असे सांगताना ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडिज दिल्यानंतर पदे मिळतात हे सांगण्याची नीलम यांना गरज होती का? पदे मिळविण्याठी पक्षाच्या प्रमुखांना काय काय भेटी किंवा गिफ्ट द्यावे लागते असा कोणी प्रश्न विचारला होता का? नीलम गोऱ्हे यांनी दिल्लीच्या व्यासपीठावर मर्सिडिज आणताना त्यांना नेमके काय अभिप्रेत होते? तसे बोला असे त्यांना कोणी सांगितले होते की त्यांनी आपणहून उबाठा सेनेच्या पक्षप्रमुखांना टार्गेट केले?

मर्सिडिज ही महागडी मोटार आहे. त्याची किंमत साठ लाखांपासून चार–पाच कोटींपर्यंत आहे. दोन मर्सिडीज देऊन पदे मिळवणारा नेता किती गब्बर असावा याची सामान्य शिवसैनिकांना कल्पना करणेही त्याच्या आवाक्याच्या पलीकडचे आहे. सत्तेच्या परिघात व राजकीय संघटनेत प्रमुखांना किंवा त्यांच्या चौकडीतील नेत्यांना इच्छुकांकडून असे गिफ्ट मिळत असतात. शुभेच्छा देण्यासाठी व आशीर्वाद मागण्यासाठी कोणी फुलांचा गुच्छ किंवा मिठाई देतो, तर काही सोन्या–चांदीच्या वस्तू किंवा पाकिटे देतात. पैसै देऊन पदे किंवा तिकिटे दिली जातात, असा आरोप वर्षानुवर्षे केला जातो आहे. त्यावर पक्षानेही कधी खुलासा केला नाही किंवा त्याचा इन्कारही केलेला नाही. मग नीलम गोऱ्हे चुकीच्या बोलल्या असे कसे म्हणता येईल? नीलम गोऱ्हे यांच्या विरोधात आटापिटा करणारे त्या त्यांच्या पक्षात असताना गप्प का बसले होते? त्या पैसे मागतात, साड्या मागतात, मातोश्रीवर जाऊ देत नाहीत, असे आरोप त्यांच्यावर आता केले जात आहेत. तरीही त्यांना पक्षाने चार टर्म आमदारकी, उपनेतेपद, विधान परिषदेत उपसभापती पद का दिले? तेव्हा त्यांचा पक्षाला काही ना काही उपयोग होता म्हणून त्यांना पक्षाकडून विधिमंडळात सतत पाठवले जात होते ना... आता त्यांनी साहित्य संमेलनात मर्सिडिज काढताच त्या एकदम वाईट्ट ठरू लागल्या..

नीलम गोऱ्हे यांनी रामदास आठवले यांच्या रिपब्लिक पक्षात, प्रकाश आंबेडकर यांच्या भारीप बहुजन महासंघमध्ये, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही काम केले. पण त्यांना राजकीय जीवनात लॉटरी लागली ती ठाकरेंच्या शिवसेनेत. बाळासाहेब ठाकरेंच्या उपस्थितीत त्यांचा शिवसेनेत प्रवेश झाला. सन २००० पासून त्या विधान परिषदेवर आहेत. पक्षासाठी रस्त्यावर लढणाऱ्या महिलांना डावलून पक्षाने नीलम गोऱ्हे यांना सातत्याने आमदारकी दिली, म्हणून महिला आघाडीत गेले वीस वर्षे असंतोष आहे. तोच संताप आता नीलमताईंनी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर मर्सिडिज आणल्यामुळे बाहेर पडला असे दिसले. ठाकरेंच्या शिवसेनेने नीलम गोऱ्हे यांना उपसभापती पदही दिले. सन २०२३ मध्ये ठाकरेंच्या शिवसेनेत एकनाथ शिंदे यांनी बंडाचा झेंडा फडकवल्यावर राज्यातील राजकीय समीकरणे बदलली. शिंदे मुख्यमंत्री असतानाच नीलम गोऱ्हे या ठाकरेंच्या पक्षाला जय महाराष्ट्र करून एकनाथ शिंदे त्यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला व त्याचा फायदा त्या उपसभापती पदावर कायम राहिल्या, एवढेच नव्हे, तर त्यांच्या पदाला कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा मिळाला. नीलम गोऱ्हे मुंबईत उबाठा सेनेच्या विरोधात एवढ्या जोरात कधी जाहीरपणे बोलल्या नाहीत किंवा पक्षप्रमुखांना त्यांनी टार्गेटही केले नाही. मग दिल्लीत अचानक त्यांनी मर्सिडिज कशी व्यासपीठावर आणली याचे कुतूहल अनेकांना आहे. चार टर्म त्या आमदार आहेत पण त्यांना मंत्रीपद कधी मिळाले नाही. आपणाला पद मिळविण्यासाठी काही द्यावे लागले नाही, पण आपल्या निरीक्षणाच्या आधारे आपण बोललो असे त्या सांगत आहेत. त्यामुळेच साहित्य संमेलनात मर्सिडिस धावली त्याचे गूढ वाढले आहे.

**राष्ट्रनामा**



**सुकृत खांडेकर**
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com

निवडणूक आयोग मान्यताप्राप्त शिवसेनेचे प्रमुख व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मात्र या वादळात नीलम गोऱ्हे यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले. ते म्हणतात – नीलम गोऱ्हे या काही खोटे बोलल्या नाहीत. ठाकरेंच्या शिवसेनेत मर्सिडिज दिल्यावर पद मिळते, असे त्या ज्या व्यासपीठावर बोलल्या ते योग्य होते की चुकीचे होते हा भाग वेगळा आहे. यापूर्वी असेच अनेक नेते बोलले आहेत. आम्ही देना बँक आहोत, समोरचे लेना बँक आहेत.

नीलम गोऱ्हे जे बोलल्या ते कटू सत्य आहे. नीलम गोऱ्हे या महिलांवर अत्याचार झाला की त्या धावून जात. तेव्हा त्या चांगल्या होत्या. शक्ती विधेयकातही त्यांचे मोठे योगदान आहे. महिला सक्षमीकरणासाठी त्या चांगले काम करतात, ही त्यांची (पक्षप्रमुख) पोटदुखी आहे. ती थांबत नाही, कारण ते डॉक्टरकडून नव्हे तर कंपाऊंडरकडून औषध घेतात... असा टोला एकनाथ शिंदेंनी उबाठा सेनेच्या पक्षप्रमुखांना लगावला आहे.

याच साहित्य संमेलनाच्या निमित्ताने दिल्लीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सार्वजनिक कार्याचा गौरव म्हणून महदजी शिंदे पुरस्कार शरद पवार यांच्या हस्ते देण्यात आला. केंद्रीयमंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या साक्षीने हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात एकनाथ शिंदेंवर पवारांनी गुणगौरवांचा वर्षाव केला. त्यामुळे उबाठा सेनेचे पित्त खवळले. ज्यांनी गद्दारी करून पक्ष फोडला आणि उद्धव ठाकरे यांचे सरकार पाडले, त्या गद्दाराला महदजी शिंदे पुरस्कार कसा दिला असा प्रश्न विचारून शरद पवारांच्या विरोधातही उबाठा सेनेने थयथयाट केला. संमेलनाच्या व्यासपीठावरून नीलम गोऱ्हे यांनी मातोश्रीवर सोडलेल्या दोन–दोन मर्सिडिज आणि शरद पवारांनी एकनाथ शिंदेंवर केलेला स्तुतिसुमनांचा वर्षाव यामुळे उबाठा सेना रक्तबंबाळ झाली. दलालांचे संमेलन, सरकारी विळख्यात संमेलन अशी टीका झाली. साहित्य महामंडळाने माफी मागावी तसेच शरद पवारांनी व तारा भवाळकरांनी या दोन्ही बाबींचा निषेध करावा अशी मागणी झाली. शिंदे व गोऱ्हे यांच्या उपस्थितीने व त्यांच्या भाषणांनी उबाठा सेनेचा जळफळाट झाला. शरद पवारांवर चिखलफेक होते तेव्हा आम्ही उभे राहतो मग पक्षप्रमुखांवर आरोप होतात तेव्हा पवार गप्प कसे असा प्रश्न उबाठा सेनेने विचारला.

पवारांनी पत्रकार परिषद घेऊन नीलम गोऱ्हे यांचे विधान मूर्खपणाचे होते, असे सुनावले. राज्याच्या विधिमंडळात त्या ४ टर्म आमदार आहेत पण त्या कशा मिळाल्या, हे महाराष्ट्राला ठाऊक आहे... असेही म्हटले. मात्र एकनाथ शिंदे यांचा आपण केलेल्या सत्काराचे पवारांनी ठामपणे समर्थन करून उबाठा सेनेला जास्त लुडबूड करू नका असा सज्जड दम दिला. मी कुणाचा सत्कार करायचा व कुणाचा नाही, यासाठी परवानगी घ्यावी लागत असेल, तर मी लक्षात ठेवेन... शिंदेंसह १५ जणांचा तेथे सत्कार झाला, पण १४ लोकांची नावे कुणी छापलीही नाहीत... दिल्ली साहित्य संमेलनाच्या निमित्ताने एकनाथ शिंदे यांना मिळालेल्या महदजी शिंदे गौरव पुरस्काराने मातोश्रीची जळजळ वाढली आणि नीलम गोऱ्हे यांनी सोडलेली मर्सिडिज थेट मातोश्रीवर आदळली.

# ३ मार्च रोजी साजरा केला जाणारा जागतिक वन्यजीव दिन

दरवर्षी ३ मार्च रोजी साजरा केला जाणारा जागतिक वन्यजीव दिन हा जगातील वन्य प्राणी आणि वनस्पतींबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्यांचा उत्सव साजरा करण्यासाठी समर्पित एक जागतिक कार्यक्रम आहे. २०२५ मध्ये, वन्यजीव संवर्धन वित्त: लोक आणि ग्रहात गुंतवणूक ही थीम आहे, जी आपल्या ग्रहाच्या जैवविविधतेचे रक्षण करण्यासाठी नाविन्यपूर्ण आर्थिक उपायांच्या गंभीर गरजेवर भर देते. जागतिक वन्यजीव दिन वन्यजीवांच्या अंतर्गत मूल्याची आणि अधिवासाचे नुकसान, हवामान बदल आणि बेकायदेशीर शिकार यासह त्यांना भेडसावणाऱ्या धोक्यांना तोंड देण्याची तातडीची गरज याची आठवण करून देतो.

**इतिहास :** संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने २०१३ मध्ये ३ मार्च हा दिवस जागतिक वन्यजीव दिन म्हणून घोषित केला, १९७३ मध्ये त्याच दिवशी CITES स्वीकारला गेला. वन्यजीवांमधील आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियमन करण्यात CITES महत्त्वाची भूमिका बजावते, जेणेकरून अशा क्रियांमुळे प्रजातींचे अस्तित्व धोक्यात येणार नाही याची खात्री केली जाऊ शकते. गेल्या पाच दशकांमध्ये, CITES ने शाश्वत आणि कायदेशीर व्यापार पद्धतींना प्रोत्साहन देवून असंख्य प्रजातींचे विलुप्त होणे रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**महत्त्व :** जागतिक वन्यजीव दिन हा पर्यावरणीय संतुलन राखण्यात आणि मानवी कल्याणाला पाठिंबा देण्यात वन्यजीवांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करतो. जैवविविधता अन्न सुरक्षा, औषध, स्वच्छ हवा आणि पाणी आणि हवामान लवचिकतेमध्ये योगदान देते. तथापि, मानवी क्रियांमुळे जैवविविधतेचे अभूतपूर्व नुकसान झाले आहे, ज्याचे महत्त्वपूर्ण आर्थिक, पर्यावरणीय आणि सामाजिक परिणाम झाले आहेत. हा दिवस भविष्यातील पिढ्यांसाठी वन्यजीव संसाधनांचे संवर्धन आणि शाश्वत व्यवस्थापन करण्यासाठी कृती करण्याचे आवाहन करतो.

**सहभाग :** जागतिक वन्यजीव दिन साजरा करण्यासाठी स्थानिक वन्यजीव, संवर्धन आव्हाने आणि जैवविविधतेचे महत्त्व याबद्दल माहिती करून घ्या. निसर्गाशी संबंध वाढवून वन्यजीवांचे निरीक्षण करण्यासाठी नैसर्गिक अधिवासात सहली आयोजित करा. नैसर्गिक अधिवास पुनर्संचयित करण्यासाठी वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम किंवा आक्रमक प्रजाती काढून टाकण्यात सहभागी व्हा. वन्यजीव निरीक्षण कार्यक्रमांमध्ये निरीक्षणे नोंदवून संशोधनासाठी डेटा गोळा करून योगदान करा. प्लास्टिकचा वापर कमी करणे, शाश्वत उत्पादनांना पाठिंबा देणे आणि कार्बन फूटप्रिंट कमी करणे यासारख्या पर्यावरणपूरक सवयींचा अवलंब करा. जागतिक वन्यजीव दिनानिमित्त वन्यजीव आणि त्यांच्या अधिवासांचे संरक्षण करण्याची प्रतिज्ञा करण्याचे आवाहन महाराष्ट्र पक्षिमित्राचे नागपूर विभागाचे विदर्भ समन्वयक राहुल वकारे यांनी केले आहे.

## राशीभविष्य

**मेष :** खराब आर्थिक स्थितीमुळे तणाव निर्माण होईल. ज्याचे घरचे लोक पुन्हा पुन्हा टोमणे मारतील. यामुळे मन अतिशय उदास होईल. सरकारी मदतीचे काही फायदे मिळू शकतात.

**वृषभ :** पैशाचे उत्पन्नाचे स्रोत वाढवण्याचा प्रयत्न करा. आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागेल. जास्त भावनिकता टाळा. वैवाहिक जीवनात एकमेकांच्या भावनांचा आदर करा.

**मिथुन :** जमीन, इमारती आणि वाहनांच्या खरेदी–विक्रीमध्ये गुंतलेल्या लोकांना फायदा होईल. तुम्हाला तुमच्या सासरच्या लोकांकडून एक मौल्यवान भेट मिळू शकते. मान–सन्मान व प्रतिष्ठा वाढेल.

**कर्क :** आज आरोग्य सुधारेल. घर आणि कौटुंबिक आरोग्याबाबत तुमची चिंता संपेल. तुम्ही तुमच्या आरोग्याबाबत खूप जागरूक आणि सावध राहाल. ज्यामुळे तुम्ही तणावमुक्त आणि निरोगी राहाल.

**सिंह :** आज आरोग्यासंबंधी किरकोळ समस्या निर्माण होतील. खाताना व्यायाम करा. विशेषत: प्रवासात आरोग्याकडे अधिक लक्ष द्या. आरोग्य लाभ मिळण्याचे संकेत आहेत.

**कन्या :** मनात सकारात्मकता राहील. राजकीय क्षेत्रातील लोकांना महत्त्वाची मोहीम मिळू शकते. प्रवासात मौल्यवान वस्तूंची काळजी घ्या. व्यवसायात जोडीदाराचे विशेष सहकार्य मिळेल.

**तुळ :** कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे सरकारी अधिकाजयाच्या मदतीने दूर होतील. रस्त्यावर वाहने खराब झाल्याने समस्या उद्भवू शकतात. व्यावसायिक नियमांमुळे त्रास होईल.

**वृश्चिक :** आज व्यवसायात उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न फलदायी ठरतील. व्यवसायात नवीन करारांमुळे व्यवसायाची स्थिती सुधारेल. तुम्हाला भरपूर पैसे मिळतील. पैसा हुशारीने वापरण्याचा प्रयत्न करा

**धनु :** आज घनिष्ठ नातेसंबंधांमध्ये आनंद मिळून समाधान मिळेल. वरिष्ठ प्रिय व्यक्तीकडून तुम्हाला विशेष प्रेम आणि सहकार्य मिळेल. कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील.

**मकर :** सामाजिक दृष्ट्या लाभदायक परिस्थिती निर्माण होईल. आर्थिक स्थितीत मोठे चढ–उतार येतील. वडिलोपार्जित संपत्ती अचानक प्राप्त होऊ शकते. व्यवसायात उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होईल.

**कुंभ :** आज घरात वादाचे वातावरण असू शकते. अनावश्यक धावपळीमुळे शारीरिक व मानसिक त्रास संभवतो. भाऊ विरोधापासून सुरक्षित राहिले. चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही बातम्या मिळू शकतात.

**मीन :** व्यवसायात उत्पन्न चांगले राहील. नोकरीत बढतीसह उत्पन्नही वाढेल. तुम्हाला एखाद्या जवळच्या मित्राकडून मौल्यवान भेट मिळू शकते. धार्मिक कार्यात आर्थिक लाभ होईल. आर्थिक स्थिती मजबूत होईल.

## शब्दकोडे क्रमांक २०४९



**आडवे शब्द :–**
१) कृती नाही फक्त आश्वासन या अर्थाची एक म्हण
१०) विष
११) टिंगल, चेष्टा
१२) मगज
१४) संगीतातील एक राग, शंकर
१६) चाणक्यनीतितील पहिले दोन प्रकार
१९) गेरू
२१) वितरण
२३) कागदी चलन
२५) सद्वर्तन
२६) बारीक सारीक
२७) होडी चालविणारा
२९) पराजय
३०) रस्ता
३२) स्वयंपाकी
३३) उंटाच्या पाठीवरील उंचवटा
३६) परीक्षा, ज्ञान
३८) सत्वयुक्त
४०) ज्याला शत्रू नाही असा
४२) पटाईत
४४) संगीतातील ठेका
४६) विहिरीचा एक प्रकार
४७) मेहेरबानी, उपकार
४८) ऐनवेळी कच खाणारा
५१) ज्याला वतन मिळालेले आहे असा
५३) गमन करणे
५४) एक सुगंधी पान
५७) न्यूनता, चणचण
५९) रात्रीचा पहारेकरी
६०) सरदाराचा हुद्दा
६१) मध्यस्थ
६३) बशीचा जोडीदार
६५) माशाची एक जात
६७) बाजू, काठ
६८) कुजके पाणी
७१) कट्टा
७३) गाणे गाणारा
७४) भीती
७५) अत्यंत धनाढ्य व्यक्ती

**उभे शब्द :–**
१) बिना दातांचे तोंड
२) नोकर
३) किंचित भाजलेले
४) युद्धातील समेट
५) दर्पण
६) डोंगराच्या पोटातून जाणारा रस्ता
७) कापडाचा एक प्रकार
८) डाग देताना होणार चर्रर आवाज, चटका
९) रास
१३) प्रजा, कुळावरील सरकारी कर्ज
१५) वैरी, दावा लागणारा
१७) थोरवी, मोठेपणा
१८) रमणीय दृष्य
२०) वचन पाळणारा
२१) उत्तराधिकारी
२२) पापणी (हिं )
२४) हजार शेराचे माप, वजन
२५) मदतनीस
२८) खोटीच्या विरुद्ध
३१) भय
३२) संगमरवरी दगड
३३) मस्त स्त्री
३४) गणितातील उणे
३५) श्रीविष्णूचे एक नाव
३७) खेद
३९) त्रास देणे
४१) होडी
४३) देव
४५) एक नक्षत्र
४७) केलेले, चार युगांपैकी पहिले
४८) मेंढ्या पाळणारा
४९) नेत्र
५०) वृक्ष
५१) वेड लागलेला, खुळा
५२) घरोघर
५४) केर काढण्याचे साधन
५५) माल साठविण्याची जागा
५६) चुलता
५७) भांडण, चर्चा
५८) लाकूड छिलण्याचे हत्यार
६०) सखी, मैत्रीण
६२) मोठी वाटी
६४) धर,
६६) कामदेव
६८) श्वसनेंद्रिय,
६९) आशीर्वाद
७०) दुर्दशा
७१) चरण
७२) वाळवंट

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# कॅलिडोस्कोप

## एका ट्रेनमधून अख्खं गाव करू शकेल प्रवास!

भारतातील पहिली सर्वात 'सुपर स्पेशल ट्रेन लॉंच' होणार आहे. ही ट्रेन वंदे भारत ट्रेनचे सुपर मॉडेल असणार आहे. ही ट्रेन १६ किंवा १८ नाही तर तब्बल २४ डब्यांची असणार आहे. म्हणजेच एक संपूर्ण गाव या ट्रेनमधून प्रवास करू शकेल. या स्लीपर ट्रेनमध्ये प्रवाशांना जबरदस्त सोई सुविधा मिळणार आहेत. विशेष म्हणेज भारतातील अनेक महत्वाच्या आणि अतिजलद रेल्वे मार्गावर ही २४ डब्यांची वंदे भारत स्लीपर ट्रेन धावणार आहे. सध्या वंदे भारत ही थेट २४ डब्यांची स्लीपर वंदे भारत ट्रेन सुरू करण्यासाठी जोरदार प्रयत्न करत आहे. २४ डब्यांची स्लीपर वंदे भारत ट्रेन ही भारतातील शाही ट्रेन असेल. १६ कोचच्या स्लीपर वंदे भारतमध्ये तीन वर्ग आहेत. एसी फर्स्ट, एसी सेकंड आणि एसी थर्ड. त्याची एकूण प्रवासी क्षमता १६९२ इतकी आहे; मात्र, याला आठ कोच जोडल्याने त्याची प्रवासी क्षमता १६९२ इतकी होईल. आतापर्यंत कोणत्याही लक्झरी ट्रेनमध्ये इतकी प्रवासी क्षमता नाही. ही ट्रेन सध्याच्या 'वंदे भारत'पेक्षा अधिक भारातातील सर्वात जलद आणि आलिशान ट्रेन आहे. भारतीय रेल्वे लवकरच वंदे भारत स्लीपर ट्रेन सुरू करणार आहे. काही दिवसांपूर्वीच मुंबई-अहमदाबाद मार्गावर या ट्रेनची यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे.

पहिल्या १६ डब्यांच्या 'वंदे भारत स्लीपर ट्रेन'ने १५ जानेवारी रोजी' रिसर्च डिझाईन अँड स्टॅंडर्ड्स ऑर्गनायझेशन' (आरडीएसओ) कडून घेण्यात आलेली कठोर चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली. यानंतर आता रेल्वे आधुनिक असणार आहे. या ट्रेनमध्ये एअर कर्टन, क्रॅश बफर, फायर बॅरियर वॉल, पॅडेड बर्थ आणि ऑनबोर्ड वायफाय सारख्या सुविधा मिळणार आहेत. भारतीय रेल्वेने १७ डिसेंबर२०२४ रोजी २४ डब्यांच्या 'वंदे भारत स्लीपर ट्रेन सेट'च्या ५० रेकसाठी 'प्रोपल्शन इलेक्ट्रिक'ची मोठी ऑर्डर दिली आहे. ही ऑर्डर दोन आघाडीच्या भारतीय उत्पादकांना देण्यात आली आहे.



## बुर्ज खलिफाच्या लिफ्टचा वेग रॉकेटइतका!

दुबई म्हटले, की सगळ्याच बाबतीत आकर्षण. अगदी इमारतींपासून ते तेथील लाईफस्टाईलपर्यंत. त्यात दुबईतील बुर्ज खलिफा ही इमारत म्हणजे दुबईची खरी ओळख म्हले, तर चुकीचे ठरणार नाही. बुर्ज खलिफा ही जगातील सगळ्यात उंच इमारत आहे. तसेच बुर्ज खलिफा ही जगातील सर्वात महागडी इमारत म्हणूनही ओळखली जाते. १६३ मजल्यांची बुर्ज खलिफा ही थेट आकाशाला भिडणारी आहे.

बुर्ज खलिफाची उंची एवढी आहे, की ती नव्वद किलोमीटर अंतरावरूनही इमारत दिसते. जगात फक्त या इमारतीचीच नाही तर या इमारतीमधील लिफ्टचीही तेवढीच चर्चा आहे. कारण बुर्ज खलिफामधील लिफ्ट ही जगातील सर्वात वेगवान लिफ्ट मानली जाते. बुर्ज खलिफामधील लिफ्टची खासियत म्हणजे या लिफ्टचा स्पीड. ही लिफ्ट रॉकेटच्या स्पीडने वर जाते, म्हणजे ही लिफ्ट ५९ सेकंदात १२४ थेट माळ्यावर पोहचते. हे जाणून कोणालाही आश्चर्य वाटेल. बुर्ज खलिफामध्ये ५८ लिफ्ट आहे. बुर्ज खलिफामधील लिफ्ट दहा मीटर प्रति सेकंद वेगाने हलते. ताशी ३६ किलोमीटर वेगाने ही लिफ्ट वर जाते. या लिफ्टला इमारतीच्या १२४ व्या मजल्यावर असलेल्या 'अॅट द टॉप' या डेकवर पोहोचण्यासाठी फक्त दोन मिनिटे लागतात. 'अॅट द टॉप' या डेकवरुन दुबई शहराचे डोळे दिपवणारे दृश्य पाहायला मिळते.

ओटिस कंपनीने बुर्ज खलिफामध्ये लिफ्ट बनवल्या आहेत. या लिफ्टमध्ये एकाच वेळी १२ ते १४ लोक जाऊ शकतात. इमारत सेवा तसेच अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांसाठी बसवण्यात आलेली लिफ्ट एका वेळी ५५०० किलो सामान वाहून नेऊ शकते. ही जगातील सर्वात उंच सर्व्हिस लिफ्ट आहे. यासह बुर्ज खलिफामधील ही जगातील तिसऱ्या क्रमाकांची वेगवान लिफ्ट आहे. जगात आणखी अशा दोन इमारती आहेत ज्यांचा लिफ्टचा वेग बुर्ज खलिफापेक्षा जास्त आहे. तैवानमध्ये तैपेई नावाची एक इमारत आहे, जिथे जगातील सर्वात वेगवान लिफ्ट आहे. ही इमारत ५०९ मीटर उंच आहे. त्यामध्ये बसवलेल्या लिफ्टचा वेग १०१० मीटर/मिनिट आहे. याचा अर्थ या लिफ्टचा वेग ताशी ६०.६ किलोमीटर आहे. दुसऱ्या क्रमांकावर योकोहोमा लॅंडमार्क टॉवर येतो. ही इमारत २९६ मीटर उंच आहे. त्यामध्ये बसवलेल्या लिफ्टचा वेग ७५० प्रति मिनिट आहे. म्हणजेच या लिफ्टचा स्पीड ताशी ४५ किमी इतका आहे.

अशा अनेक कारणांमुळेच बुर्ज खलिफा पर्यटकांचे ड्रीम डेस्टिनेशन असते. बुर्ज खलिफा इमारत इस्लामिक स्थापत्यकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. बुर्ज खलिफामध्ये २९५७ पार्किंग स्पेस आणि ९०० अपार्टमेंट आणि ३०४ हॉटेल्स आहे. त्यामुळे तुम्ही कधी दुबईला गेलात, तर बुर्ज खलिफा इमारतीच्या सुंदरतेचा आणि या इमारतीमधील लिफ्टचा थ्रीलिंग अनुभव घ्यायला विसरू नका.



## हा चहा आहे महाग

चहाबाजांना दर्जेदार चहा लागतो. मस्त कडक चहा प्यायल्याशिवाय त्यांना ताजंतवानं वाटत नाही. म्हणूनच चहा पावडरवर खर्च करण्याची त्यांची तयारी असते. आसाममध्ये चहाचे मळे आहेत. इथे विविध प्रकारच्या आणि दर्जाच्या चहाचं उत्पादन केलं जातं. मध्यंतरी 'गोल्ड टी' या प्रकाराला खूप मोठी किंमत मिळाली. गोल्ड टी प्रकारातल्या एक किलो चहासाठी तब्बल ५० हजार रुपये मोजण्यात आले. गोल्ड टी हा चहाचा दुर्मिळ प्रकार आहे. या चहाची चव खूपच वेगळी असते. ती बराच काळ जिभेवर रेंगाळत रहाते. गेल्या वर्षी या चहाला प्रतिकिलो ३९ हजार इतकी किंमत मिळाली होती.



## मैत्रिणीसाठी लिंगपरिवर्तन

प्रेमात पडलेल्या व्यक्तीला काळ, वेळ, स्थळ कशाचेही भान नसते असं म्हटलं जातं. प्रेमात माणूस वाट्टेल ते करू शकतो. कोणाच्या, कधी प्रेमात पडावं यावरही लोकांचं नियंत्रण नसतं, कोणावरही प्रेम जडू शकतं. एखाद्या महिलेने महिलेशी आणि पुरूषाने पुरूषाशी लग्न केल्याच्या घटनाही हल्ली घडतात. उत्तर प्रदेशच्या मथुरामध्ये एक अशीच वेगळी घटना आहे. तेथे एका मैत्रिणीच्या प्रेमात पडलेल्या तररुणीने तिचं लिंगपरिवर्तनच करून घेतलं. आपली जुनी ओळख पुसून सविता आता ललित बनली आहे. नंतर दोघांनीही पळून जाऊन आर्य समाज मंदिरात जाऊन लग्न केलं आणि आता ते एकत्र रहात आहेत.

जेव्हा जयपूर पोलिस हे पूजा नावाच्या मुलीच्या शोधात मथुरेच्या महावनमध्ये पोहोचले, तेव्हा हा सगळा प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी पूजाला परत जयपूरला नेले आणि त्यानंतर ही प्रेमकथा समोर आली. ३१ वर्षीय सविता ही भरतपूरची रहिवासी आहे. एसएससी कोचिंगसाठी ती जयपूरला आली होती. सांगानेर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रमेश नावाच्या व्यक्तीच्या घरात ती भाड्याने राहू लागली. रमेशची मुलगी तिच्याच वयाची होती. त्यामुळे दोघींची चांगली मैत्री झाली आणि काही काळातच दोघी एकमेकांच्या जवळ आल्या. कोचिंग संपल्यानंतर सविता भरतपूरला परत गेली; पण त्यानंतरही तिची आणि पूजाची भेट सुरुच राहिली. कालांतराने त्यांच्या मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. दोघींनीही एकत्र जगण्याची आणि मरण्याची शपथ घेतली आणि आयुष्यभर



जोडीदार बनून राहण्याचा निर्णय घेतला; मात्र समाजाच्या बंधनांवर मात करण्यासाठी सविताने मोठे पाऊल उचलले आणि लिंग परिवर्तन करून ती सविताची ललित बनली. यानंतर ते दोघेही पती-पत्नी म्हणून एकत्र राहू लागले.

पूजाच्या प्रेमात पडलेल्या सविताने ३१ मे २०२२ रोजी इंदूरमध्ये तिचे लिंग परिवर्तन केलं आणि ती सविताची ललित झाली. यानंतर नोव्हेंबर २०२४ मध्ये सविता आणि पूजाचे आर्य समाज वैदिक संस्थान मंडळ, जयपूर येथे लग्न झाले; पण पूजाने हे गुपित तिच्या घरच्यांपासून लपवून ठेवलं होतं; मात्र त्याच दरम्यान, पूजाच्या वडिलांनी एका मुलासोबत तिचं लग्न ठरवलं; पण हे लग्न टाळण्यासाठी पूजाने आपण बीएड करण्यासाठी भरतपूरला जात असल्याचे वडिलांना सांगितले. १० जानेवारी रोजी पूजाने भरतपूरला पोहोचून तिचा मोबाईल बंद केला. कुटुंबीयांनी मुलीचा शोध घेण्याचा खूप प्रयत्न केला; मात्र तिचा काहीच शोध लागला नाही. त्यानंतर तिच्या कुटुंबीयांनी १४ जानेवारी रोजी जयपूरमधील सांगानेर पोलिस ठाण्यात पूजा बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली. पोलिसांनी तिचे मोबाईल लोकेशन ट्रॅक केले असता ते मथुरेच्या महावन पोलिस ठाण्याच्या परिसरात सापडले. जयपूर पोलिसांनी तेथे छापा टाकून पूजा आणि ललितला पकडले. अखेर चौकशीत ललितने सांगितले, की तो महावन येथील फार्मसी कॉलेजमध्ये काम करतो आणि पूजा त्याच्यासोबत पत्नी म्हणून राहत आहे. पूजानेही पोलिसांना स्पष्टपणे सांगितले, की तिला ललितसोबतच राहायचे आहे. दोघेही प्रौढ आहेत त्यामुळे पोलिसांनी त्यांना सोडून दिलं.

## कर्मचारी मिळवण्यासाठी कंपनीचा असाही फंडा!

जर एखाद्या कंपनीला मार्केटमध्ये स्वत:ला प्रस्थापित करायचे असेल, तर त्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कर्मचारी कंपनीशी प्रामाणिक असणे. प्रत्येक कंपनी प्रामाणिक कर्मचाऱ्यांचा शोध घेते आणि अनेक कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना लाच देऊन प्रामाणिक बनवतात. असेच पाऊल एका जपानी कंपनीने उचलले आहे. तीने आपल्या नवीन कर्मचाऱ्यांना आकर्षित करण्यासाठी मोफत अल्कोहोल आणि हॅंगओव्हर रजा दिली आहे.

मोठ्या कंपन्यांशी स्पर्धा करण्यासाठी या कंपनीने एक वेगळी युक्ती आणली आहे, ज्यामध्ये ओसाकामधील एक लहान आयटी कंपनी अलीकडे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. आता सोशल मीडियावर यूजर्सही कंपनीच्या या निर्णयावर वेगवेगळ्या गोष्टी सांगत आहेत. कंपनी आपल्या कर्मचाऱ्यांना मोफत दारू आणि हॅंगओव्हर रजा देत आहे. कामाच्या दरम्यान दारू पिणे सामान्यतः योग्य मानले जात नाही. कारण दारू प्यायल्यानंतर कोणतीही व्यक्ती शुद्धीत राहत नाही; परंतु ट्रस्ट रिंग कंपनी लिमिटेडच्या बाबतीत असे नाही. ही कंपनी मिडोरीबाशी, ओसाका येथील एक छोटी कंपनी आहे, जी आयटीचे प्रतिनिधित्व करते.

येथे बॉस स्वतः दारू आणतो आणि आपल्या नवीन कर्मचाऱ्यांना सर्व्ह करतो. याशिवाय जर एखाद्या कर्मचाऱ्याने जास्त दारू प्यायली, तर कंपनी त्याला हॅंगओव्हर रजादेखील देते. याशिवाय कर्मचारी दारूच्या नशेत कामावर उशिरा येऊ शकतात आणि तेही कोणत्याही प्रश्नाशिवाय. 'ऑडिटी सेंट्रल'च्या अहवालानुसार, एका महिला कर्मचाऱ्याने नुकतेच कानसाई टीव्हीला सांगितले, की मी 'हॅंगओव्हर लीव्ह' युक्ती वापरल्याने मी १२ वाजता कामावर परत जाऊ शकते. आणखी दोन किंवा तीन तास झोपू शकता आणि नंतर स्वच्छ मनाने कामावर परत येऊ शकता. मला वाटते की यामुळे मला अधिक कौशल्य मिळेल.



## मुलीच्या लग्नात साडेपाचशे कोटी उडवणारा झाला रंक!

काळ खूप बलवान असतो.... राजाचा रंक अन्? रंकाचा राजा कधी होईल हे कुणालाच कळत नाही. सुख-दुःख, विजय-पराजय, श्रीमंती-गरिबी, उदय-पतन अशा भरती ओहोटीसारख्या अनेक घटना मनुष्याच्या आयुष्यात घडत असतात. असेच काहीसे प्रसिद्ध उद्योगपती प्रमोद मित्तल यांच्यासोबत घडले आहे. लेकीच्या लग्नात ५५० कोटी उधणारे प्रमोद मित्तल आता देशोधडीला लागले आहेत. त्यांचे सर्व साम्राज्य धुळीस मिळाले आहे. जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत प्रमोद मित्तल यांचे नाव घेतले जात होते. आता त्यांचे अब्जावधींचे साम्राज्य संपुष्टात आले आहे. २०२० मध्ये मित्तल हे दिवाळखोर झाले. त्यानंतर लंडन न्यायालयाने त्यांना दिवाळखोर म्हणून घोषित केले.

प्रमोद मित्तल हे प्रसिद्ध उद्योगपती लक्ष्मी मित्तल यांचे बंधू आहेत. प्रमोद मित्तल स्टील इंडस्ट्रीज लिमिटेडचे म्हणजेच आत्ताची जेएसडब्ल्यू स्टील कंपनीचे ते अध्यक्ष राहिले होते. एकेकाळी त्यांची गणना जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींमध्ये केली जायची. आलिशान लाईफस्टाईल आणि खर्चिक सवयींसाठी ते ओळखले जायचे. त्यांचा मुलीच्या लग्न सोहळ्याची आजही चर्चा होते. २०१३ मध्ये त्यांच्या मुलीचा शाही विवाह सोहळा पार पडला. मुलगी सृष्टीच्या हिच्या लग्नात मित्तल यांनी जवळपास ५५० कोटी रुपये खर्च केले होते. जगभरात हा लग्न सोहळा चर्चेचा विषय बनला होता.

दिवाळखोरीनंतर त्यांची आर्थिक परिस्थिती इतकी ढासळली की दैनंदिन खर्चासाठी त्यांना कुटुंबावर अवलंबून राहावे लागले. त्यांच्यावर १३० दशलक्ष पौंडांपेक्षा जास्त कर्ज होते. दिल्लीत त्यांची केवळ ४५ पौंड संपत्ती शिल्लक होती. त्यांच्या दिवाळखोरीची कहाणी 'जीआयकेआयएल' या बोस्नियाच्या कोक कंपनीशी जोडलेली आहे. 'जीआयकेआयएल'च्या कर्जाची हमी प्रमोद मित्तल यांनी घेतली होती. हीच चूक त्यांच्या दिवाळखोरीचे कारण ठरली.



'जीआयकेआयएल' कर्ज फेडण्यात अपयशी ठरली. याचा फटका मित्तल यांना बसला. 'जीआयकेआयएल' लंडनस्थित स्टील ट्रेडिंग कंपनीला पैसे देऊ शकली नाही, ज्याचे मित्तल गॅरंटर होते. 'जीआयकेआयएल'सह मित्तल यांना दिवाळखोर घोषित करण्यात आले. अखेर २०१९ प्रमोद मित्तल आणि 'जीआयकेआयएल'च्या इतर दोन अधिकाऱ्यांना बोस्नियातील फसवणुकीच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. अटक झाली, तेव्हा मित्तल ६० वर्षांचे होते. यानंतर मित्तल यांचे काय झाले? सध्या ते कुठे आहेत? कोणत्या परिस्थितीत आहेत. याची काहीच माहिती समोर आलेली नाही.



## भ्रष्टाचारात भारत ९६ व्या स्थानावर

'ट्रांसपेरेंसी इंटरनॅशनल'ने २०२४ या संपूर्ण वर्षाचा 'करप्शन परसेप्शन इंडेक्स' (सीपीआय) जाहीर केला आहे. या अहवालात १८० देशांमध्ये भ्रष्टाचाराचा स्तर तपासून त्यांची रॅंकिंग करण्यात आली आहे. या यादीत भारत ९६व्या स्थानावर, तर पाकिस्तान १३५व्या स्थानावर घसरला आहे. अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो. भारतातदेखील अनेक ठिकाणी अधिकाराचा दुरुपयोग करून आर्थिक फायदा मिळवण्यासाठी भ्रष्टाचार होतो, तर कित्येक जण सत्तेचा दुरुपयोग करतात. भ्रष्टाचार हा एक अप्रामाणिकपणा किंवा फौजदारी गुन्हा आहे. 'करप्शन परसेप्शन इंडेक्स' (सीपीआय) हा एक जागतिक अहवाल आहे, जो प्रत्येक देशातील सार्वजनिक क्षेत्रातील भ्रष्टाचाराच्या पातळीचे मोजमाप करतो.

देशांना ० ते १०० या दरम्यान गुण दिले जातात. १०० गुण असलेला देश सर्वात स्वच्छ आणि पारदर्शक, तर ० गुण असलेला देश सर्वात भ्रष्ट मानला जातो. या वर्षीच्या अहवालात असे आढळले, की जगभरातील भ्रष्टाचाराची समस्या गंभीर आहे. अनेक देशांचे ५० पेक्षा कमी गुण आहेत. जवळपास ६.८ अब्ज लोक असे देशात राहतात, जिथे भ्रष्टाचाराचा स्तर जास्त आहे. सर्वात कमी भ्रष्टाचार असलेले देश डेन्मार्क असून सलग सातव्या वर्षी सर्वात कमी भ्रष्टाचार असलेला देश ठरला असून त्याला ९० गुण मिळाले आहेत. त्यानंतर फिनलंड (८८), सिंगापूर (८४), न्यूझीलंड (८३), लक्झेंबर्ग (८१), नॉर्वे (८१) आणि स्वित्झर्लंड (८१) हे देश अव्वल स्थानांवर आहेत. या यादीत दक्षिण सुदान (८ गुण) हा सर्वात भ्रष्ट देश ठरला असून तो १८०व्या स्थानावर आहे. त्यानंतर सोमालिया (१७९), व्हेनेझुएला (१७८), सीरिया (१७७) आणि येमेन, लिबिया, एरिट्रिया आणि इक्वेटोरियल गिनी (१७३) आहेत. चीन ७६व्या स्थानावर, भारत ९६व्या स्थानावर, श्रीलंका १२१व्या स्थानावर, पाकिस्तान:१३५व्या स्थानावर, बांगलादेश १५१व्या स्थानावर, तर अफगाणिस्तान १६५व्या स्थानावर आहे.

भारताची रॅंकिंग पाकिस्तानपेक्षा खूप चांगली असली तरी भ्रष्टाचार कमी करण्यासाठी अधिक प्रयत्नांची गरज आहे. शासनाने आणि नागरिकांनी मिळून पारदर्शकता आणि प्रामाणिक कारभारावर भर द्यायला हवा.

## त्यांनी पाळली सुसर

अमेरिकेतल्या पेंसिलवेनियाचे रहिवासी जोए हेनी यांच्याकडे पाळीव सुसर आहे. ती जोए यांच्या काळजाचा तुकडा आहे. 'वॅली' असं या सुसरीचं नाव असून तिच्यामुळे जोए नैराश्यातून बाहेर पडले. ६५ वर्षांचे जोए वॅलीमुळे तणावमुक्त आयुष्य जगत आहेत. या सुसरीला आपल्यासोबत ठेवण्यासाठी त्यांनी डॉक्टरांची मदत घेतली. शिवाय 'इमोशनल सपोर्ट ॲनिमल' म्हणून तिची नोंदणीही करून घेतली आहे.



पाच फूट लांबीची ही सुसर चक्क मांजरांनाही घाबरते. जोए आजारी पडल्यावर सरपटत त्यांच्या जवळ जाते. आपल्यावर सर्वांनी प्रेम करावं असं वॅलीला वाटतं. तिला जोएला मिठी मारायला खूप आवडतं. वॅली ही सुसर चार वर्षांची आहे.

वॅली काही वर्षांनी १६ फुटांची होईल. मात्र जोए यांना याबाबत काळजी वाटत नाही. जोए यांनी वॅलीला मृत्यूच्या दाढेतून वाचवलं होतं. जोए वॅलीला घेऊन बागेत आणि खरेदीलाही जातात. सुसरीला बघून लोक खूप घाबरतात. वॅली काहीच करत नसल्याचं सांगावं लागतं.